ठा. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय : बा. वा. लावा
दा. क्र. : २९७८
BVBK-0402978

नोंदणी ९८-९८ ३/१३/९८

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

## भाग पाचवा

निवेदक

मा. गो. काटकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
ना. क्र. २९७८ दिनांक ३/३/९८
विषय बा. वा. क्र. ........

कौस्तुभ प्रकाशन
नागपूर २२

BVBK-0402978

**प्रकाशक :**
शैलेश देशपांडे,
कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, नवनिर्माण सोसायटी,
राणा प्रतापनगर,
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस,
सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
१५ ऑगस्ट १९९३

**मूल्य :**
**वीस रुपये**

## *निवेदन*

*कुमार मित्रांनो!*

*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा. गो. काटकर**

# कथाक्रम

१) मूर्ख कथा ३
२) रुचिरदेव, पोतक आणि चंद्रसार यांची कथा ५
३) शापित श्रीदर्शन ११
४) अनंगरती कुणाला मिळाली ? २७
५) एकेकाची दैवगती ३१
६) परोपकारी जीमूतवाहन ४०
७) लबाड कोल्हा ५३

२९७०८ ३/१३/९०

# मूर्ख कथा

**गो**विंदशेठ नावाचा एक मोठा कापड व्यापारी होता. रत्नपूरच्या कापडबाजारात एकदा त्याने विक्रीसाठी खूप उंची भरजरी वस्त्रे खरेदी केली. ती सर्व चामड्याने मढविलेल्या मोठ्या पेट्यांत भरली. नंतर त्या पेट्या एका उंटावर लादून तो आपल्या सेवकांसह गावाकडे निघाला.

काही काळ उंटाने झपूझप् वाटचाल केली. पण पुढे मात्र तो पावले जड झाल्याप्रमाणे सावकाश चालू लागला. उंटाच्या पाठीवर जास्त ओझे पडल्यामुळे तो दमला आहे हे गोविंदशेठने जाणले. त्याला वाटले, त्या अवस्थेत त्याला पुढे पिटाळले तर कदाचित् तो मटकन् खालीच बसेल. तेव्हा त्याचे निम्मे ओझे वाहून नेण्याकरिता दुसरा एखादा उंट आणावा हे चांगले, अशा विचाराने गोविंदशेठ आपल्या सेवकांना म्हणाला, 'मी नगराकडं जाऊन दुसरा एक उंट खरेदी करून आणतो. म्हणजे या उंटाला जास्त झालेलं ओझं त्याच्या पाठीवर लादता येईल. तुम्ही इथंच थांबा. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवा. कदाचित जर पाऊस आला तर पावसाच्या पाण्यानं पेट्यांवरलं चामडं भिजणार नाही एवढी खबरदारी घ्या!' असे बजावून सांगून गोविंदशेठ नगराकडे निघून गेला.

नंतर थोड्या वेळाने क्षितिजावरून येऊ लागलेल्या काळ्या-निळ्या मेघांनी आकाशात चौफेर गर्दी केली. जोराचा वारा सुटला. आणि त्याचबरोबर पावसाच्या धारा सर्वत्र बरसू लागल्या. तेव्हा 'पेट्यांवरचं चामडं भिजू देऊ नका' अशी धन्याची आज्ञा लक्षात घेऊन त्या मूर्ख सेवकांनी उंटाच्या पाठीवरल्या पेट्या खाली उतरवून त्यातील भरजरी उंची वस्त्रे भराभर बाहेर काढली आणि त्या वस्त्रांनी सर्व पेट्या आच्छादून टाकल्या. त्यामुळे ती वस्त्रे भिजून खराब व निरुपयोगी झाली.

काही घटिकांनी गोविंदशेठ दुसरा उंट घेऊन तिथे आला. आपण खूप पैसे मोजून खरेदी केलेल्या मूल्यवान वस्त्रांची झालेली दुर्दशा पाहताच त्याच्या

तळपायाची आग मस्तकाला गेली. तो अतिशय संतापाने आपल्या सेवकांच्या अंगावर खेकसला, 'गाढवांनो, तुम्हाला काही अक्कव बिक्कल आहे की नाही! मी तुम्हाला सांगितलं एक आणि तुम्ही केलं भलंतच. माझी सारी भारी किंमतीची वस्त्रं तुम्ही पाण्यात भिजवून अगदी खराब करून टाकलीत!' असे संतापलेल्या गोविंदशेठचे बोलणे ऐकून त्याचे सेवक स्वस्थ बसले नाही. ते लगेच म्हणाले, "धनी, तुम्ही जसं बजावून सांगितलं तसंच आम्ही केलं की! त्यात आमचा काय गुन्हा! 'पावसाच्या पाण्यानं पेट्यांवरचं चामडं भिजू देऊ नका' असं तुम्हीच नव्हतं का सांगितलं?"

असे आपल्या सेवकांचे शब्द ऐकून गोविंदसेठचा राग जास्तच भडकला. तो मोठ्यांदा म्हणाला, 'महामूर्खांनो, पेट्यांवरील चामडं पाण्यानं भिजलं तर पेट्यातील भारी किंमतीची वस्त्रं भिजून खराब होतील म्हणून मी तसं सांगितलं होतं. त्याचा अर्थ तुमच्या मठ्ठ टाळक्यात शिरलाच नाही. तुम्ही शुद्ध गाढवासारखं वागून माझं फार नुकसान केलं आहे,' असे म्हणून गोविंदशेठने पेट्यांवरील वस्त्रे काढून ती पुन्हा पेट्यात भरली. नंतर पहिल्या उंटावरच्या पाठीवरले अर्धे ओझे कमी करून त्याने ते दुसऱ्या उंटावर लादले. आणि उंट व सेवक यांच्यासह कष्टी व संतप्त गोविंदशेठ आपल्या गावाकडे परतला.

घरी पोहोचताच प्रथम त्याने सेवकांची सर्व चीजवस्तू स्वतःजवळ ठेवून घेतली आणि नंतर त्यांना रिकाम्या हातांनी घराबाहेर हाकलून दिले. याप्रमाणे बोलणाराच्या बोलाचा अर्थ न जाणणारे मूर्ख भलतेच काहीतरी करतात. तसं करून वर पुन्हा मूर्खपणाचे प्रत्युत्तर देतात, स्वतःवर व दुसऱ्यावरही दुर्दशा ओढवून आणतात आणि स्वार्थाचा व परार्थाचाही नाश करतात.

# रुचिरदेव, पोतक आणि चंद्रसार यांची कथा

एके दिवशी सकाळी कौशांबी नगराचा युवराज नरवाहनदत्त उद्यानात विहार करीत होता. त्यावेळी वैशाख नगराहून आलेले दोन राजपुत्र त्याला भेटण्यास आले. तेव्हा नरवाहनदत्ताने त्यांचे स्वागत केले. त्या राजपुत्रांनीही नरवाहनदत्तला वंदन केले. नंतर त्या दोघांपैकी एक राजपुत्र नरवाहनदत्ताला म्हणाला, 'युवराज वैशाख नगराच्या राजाचे आम्ही दोघे सावत्र मुलगे. माझं नाव रुचिरदेव आणि याचं नाव पोतक आहे. माझ्याजवळ एक वेगवान हत्तीण आहे तर याच्याजवळ दोन वेगवान घोडे आहेत. मी म्हणतो माझी हत्तीण जास्त वेगवान आहे तर पोतक म्हणतो माझे घोडे जास्त वेगवान आहेत. तेव्हा खरं काय ते पाहण्याची आम्ही पैज लावली आहे. पैजेत मी हरलो तर माझी हत्तीण पोतकाला मिळेल. पोतक पैज हरला तर त्याचे दोन घोडे मला मिळतील. पण हत्तीण व घोडे यांच्या वेगातला फरक, युवराज, तूच जाणण्यास समर्थ आहेस पैजेचा निर्णय तूच बरोबर देशील अशी आमची खात्री आहे. म्हणून त्या कार्यासाठी तुला आमच्या नगरात येण्याबद्दल आग्रहाची विनंती करण्याकरिता आम्ही इथं आलो आहोत.'

नरवाहनदत्तने रुचिरदेवाची अशी आग्रहाची विनंती मान्य केली. हत्तीण व घोडे किती वेगवान आहेत, ते पाहण्याची त्यालाही उत्सुकता होती. त्याप्रमाणे रुचिरदेवाने आणलेल्या रथात बसून नरवाहनदत्त त्या दोघांसह वैशाख नगराकडे निघाला. रथाचे घोडे फार चपळ असल्यामुळे तो अल्पावधीतच वैशाख नगरास पोहोचला. त्या भव्य व व सुखसंपन्न नगरातील प्राचीन व कलाकौशल्यपूर्ण अशा काममंदिरात प्रवेशून नरवाहनदत्ताने तेथे काही काळ विश्रांती घेऊन प्रवासाचा शीण घालविला. नंतर तो तेथून जवळच असलेल्या रुचिरदेवाच्या घरी गेला. तिथे त्याचे रुचिरदेवाने भव्य आगतस्वागत व आदरातिथ्य केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजपुत्र पोतक आपली वाऱ्यासारखी चपळ



व अत्युत्कृष्ट घोड्यांची जोडी घेऊन नरवाहनदत्तासमोर आला. नरवाहनदत्ताला अश्वपरीक्षा करता येत होतीच. पोतकाचे दोन्ही घोडे खरोखरच वेगवान आहेत हे त्याने ओळखले. तेव्हा नरवाहनदत्त स्वतः रुचिरदेवाच्या हत्तीणीवर बसला. नंतर त्याने तिच्या मूळच्या वेगात आपले बळ व वेग यांचा उपयोग केला आणि त्या हत्तीणीकडून पोतकाच्या दोन्ही उत्कृष्ट घोड्यांचा पराभव केला. तेव्हा पैजेप्रमाणे ते दोन्ही घोडे रुचिरदेवाने जिंकले.

तेवढ्यात अतिशय आनंदित झालेला एक धनवंत व्यापारी तिथे आला आणि नरवाहनदत्ताला नम्रपणे वंदन करून त्याची स्तुती करू लागला. तेव्हा नरवाहनदत्ताने त्याचा सत्कार करून त्याला विचारले, 'कोण तू ? माझ्या भेटीसाठी इथं कसा आलास ?' तेव्हा तो व्यापारी म्हणाला, 'महाराज, ऐका माझा वृत्तांत !'

"लिम्या नावाच्या एका सुंदर नगरात कुसुमशार नावाचा एक फार श्रीमंत व धर्मशील व्यापारी राहात होता. शंकराच्या उपासनेने त्याला एकच मुलगा झाला. तोच मी. माझं नाव चंद्रसार. एकदा मी माझ्या काही मित्रांबरोबर देवयात्रेला गेलो. तिथे बरेच श्रीमंत लोक गोरगरिबांना द्रव्यदान करीत असलेले

मी पाहिले. तेव्हा मला वाटलं, वडिलांनी जरी खूप द्रव्य मिळविलेलं असलं तरी खूप दानधर्म करता यावा म्हणून आपणच पुष्कळ धन प्राप्त करून घ्यावं हे चांगलं! अशा विचाराने जलप्रवास करून व्यापाराच्या निमित्ताने दुसऱ्या द्वीपाला जावे असे मी ठरविले. त्याप्रमाणे रत्नांचा व्यापार करण्याकरिता नानाविध रत्ने घेऊन मी माझ्या नौकेतून जलप्रवास करीत यथावकाश दुसऱ्या द्वीपाला सुखरूप पोहोचलो.

त्या द्वीपात मी रत्नांचा व्यापार सुरू केला. त्या द्वीपाचा राजा फार धनलोभी होता. माझ्यापाशी खूप मौल्यवान रत्ने आहेत असे त्याला समजताच त्याने मला कारागृहात टाकले. पण तेथे राहणाऱ्या महीधर नावाच्या एका व्यापाऱ्याला आमच्या घराण्याची चांगली माहिती होती. ती त्याने राजाची भेट घेऊन त्याला सांगितली. तशा थोर कुळातल्या पुरुषाला बंदिवासात ठेवणं बरं नाही असेही त्याने राजाला सांगितलं. तेव्हा राजानं माझी कारागृहातून सुटका करून माझा आदरयुक्त सन्मान केला. नंतर राजाच्या कृपेने व महीधराच्या मैत्रीने मी व्यापार करीत मोठ्या सुखाने राहिलो.

एकदा तेथील मधुउद्यानात एक यात्रा भरली होती. त्या यात्रेत मी शिखर नावाच्या व्यापाऱ्याची सर्वांगसुंदर कन्या पाहिली. ती आपल्याला अनुरूप भार्या होईल असे वाटून तिला मागणी घालण्याकरिता मी शिखराकडे गेलो. तेव्हा तो म्हणाला, 'काही कारणास्तव मी कन्यादान करू शकत नाही. म्हणून मी मुलीला सिंहलद्वीपास असलेल्या तिच्या मातामहाकडं पाठवितो. तिथं तू जाऊन त्याची भेट घे. तो माझ्या मुलीचा तुझ्याशी विवाह करून देईल. मी त्याला तसं कळवतो.'

त्याप्रमाणे त्याने दुसऱ्या दिवशी आपल्या कन्येला सर्व परिवारासह नौकेतून जलमार्गाने सिंहलद्वीपाकडे रवाना केले. काही दिवसांनी मीही तिकडे जाण्याच्या तयारीला लागलो तोच, ज्या नौकेतून शिखर व्यापाऱ्याची कन्या आपल्या परिवारासह सिंहलद्वीपाकडे निघाली होती ती नौका समुद्रात बुडाली, आणि त्या अपघातातून कुणीही माणूस जिवंत सापडला नाही अशी भयंकर वार्ता सर्व नगरभर पसरली. ती ऐकून मी दुःखाने वेडापिसा झालो. मला खाणं पिणं सुचेना. इष्टमित्रांनी माझं खूप सांत्वन केलं. अखेर हृदयात आशा बाळगून मीच स्वतःला सावरलं. विचार केला, सिंहलद्वीपाला स्वतः जावं, काय घडलं

त्याची सत्यासत्यता पाहावी. त्याप्रमाणं एके दिवशी सज्ज नौकेतून मी सिंहलद्वीपाकडं निघालो.

पण त्या जलप्रवासातही माझं दुर्दैव आड आलं. झंझावातानं आभाळात गोळा केलेल्या काळ्याकुट्ट मेघातून तुफान जलधारा खाली कोसळू लागल्या. चौफेर लाटांचे तांडवनृत्य सुरू झाले. एका प्रचंड लाटेने आमची नौका एका खडकावर आपटून फोडून टाकली. माझं धन व सेवक यांना जलसमाधी मिळाली. मी समुद्रात फेकला गेलो. पण सुदैवानं मला हात दिला. मला एक मोठा लाकडाचा ओंडका सापडला. त्याच्या आधारानं मी कसाबसा समुद्र किनाऱ्यावर येऊन पडलो. तिथं दुःखीकष्टी झालेल्या मला आता काय करावं ते सुचेना. तेवढ्यात जवळच पडलेल्या सोन्याच्या एका तुकड्यानं माझी नजर खेचून घेतली. तेव्हा चटकन् उठून मी तो सोन्याचा तुकडा हस्तगत केला. नंतर जवळच्या एका गावात तो विकून काही खाद्यपदार्थ व दोन वस्त्रं खरेदी केली. मग जेवण करून मी नवी वस्त्रं परिधान केली. नंतर वेड्यासारखा वाट फुटेल तिथं भटकत अखेर मी एका अरण्यात शिरलो.

त्या अरण्यातून काही अंतर चालून जाताच थोड्या अंतरावर मला एक आश्रम दिसला. त्याच्या एका बाजूस वाळूचे एक मोठे शिवलिंग होते. त्याच्याजवळ एक मुनिकन्या बसली होती. आणि वल्कले धारण केलेली दुसरी एक कन्या शिवपूजन करीत होती. तिला पाहताच मला खात्रीनं वाटलं, ती शिखर व्यापाऱ्याची कन्याच असावी. मनात निर्माण झालेल्या आशेच्या बळावर मी पुढे जाऊन तिला विचारलं, 'हे कल्याणी, तू कोण ? इथं कशी' पण ती काहीच बोलली नाही. तेव्हा कदाचित मुनी शाप देतील या भीतीने मी जवळच्या एका झुडुपाआड जाऊन थांबलो. तेवढ्यात पूजा संपवून माझ्या दिशेकडे प्रेमळ नजर टाकून ती कल्याणी निघून गेली. तेव्हा दिवसासुद्धा अंधारून आल्यासारखं मला वाटलं.

थोड्या वेळानं बालब्रह्मचारिणी व अत्यंत तेजस्वी अशी मतंग मुनींची कन्या अकस्मात माझ्याकडं आली. तपाचरणामुळं तिला दिव्य दृष्टी लाभली होती. तिचं नाव होतं यमुना. माझ्यापाशी येऊन ती मला म्हणाली, 'चंद्रसारा, मी काय सांगते ते लक्षपूर्वक ऐक. दूरस्थ द्वीपात राहणाऱ्या शिखर नावाच्या वैश्याला जेव्हा स्वरूपसुंदर कन्या झाली तेव्हा जिनरक्षित नावाच्या एका

संन्यासी मित्रानं त्याला सांगितलं,'मित्रा, तू आपल्या हातानं या कन्येचं दान करू नकोस. कारण तिची पालनकर्ती माता दुसरी कोणी आहे. तू जर स्वतः कन्यादान केलंस तर फार मोठ्या दोषाचा धनी होशील ! म्हणून तू जेव्हा तिला मागणी घातलीस तेव्हा शिखराने तिची जलमार्गानं सिंहलद्वीपास तिच्या आजोळी रवानगी केली पण वादळानं नौका फुटली. आणि सुदैवी व आयुष्मान असलेल्या त्या शिखरकन्येला एका उत्तुंग लाटेनं समुद्रकिनाऱ्यावर आणून टाकलं. त्याच वेळी माझे वडील भगवान मतंग मुनी आपल्या शिष्यगणांसह समुद्रस्नानार्थ गेले होते. त्यांनी त्या मृतवत् पडलेल्या कन्येला पाहिलं आणि तिला सावध करून आश्रमात आणलं. नंतर ते मला म्हणाले, 'यमुने, तू या मुलीची चांगली काळजी घे !' ती वेला म्हणजे समुद्र किनाऱ्यावर सांपडल्यामुळं माझ्या वडिलांनी तिचं वेला असं नाव ठेवलं. ती इथं आपल्या गुणांनी माझ्यासह सर्वांना अतिशय प्रिय होऊन राहिली आहे. चंद्रसारा, ती पूर्वजन्मीची तुझी भार्या आहे. तू इथं आला आहेस हे मला ध्यानानं समजलं. म्हणून मी तुझ्याकडं आले आहे. आता तू माझ्याबरोबर आश्रमाकडं चल. तिथं कन्येसारखं पालन केलेल्या वेलेचा हात मी तुझ्या हातात देते.' असे म्हणून भगवती यमुनेने मला आपल्या आश्रमात नेले व तिथे असलेल्या आपल्या पित्याला सर्व हकीकत सांगितली. मी मोठ्या भक्तिभावानं मतंग मुनींना वंदन केले. त्यांच्या आशीर्वादानं मी वेलेशी विवाहबद्ध झालो.

एके दिवशी आश्रमाजवळच्या एका सरोवरात मी वेलेसह जलक्रीडा करीत असताना मी उडविलेलं पाणी तिथं स्नान करीत असलेल्या मतंग मुनींच्या अंगावर पडलं. तेव्हा, 'अभाग्यांनो, तुमची ताटातूट होईल !' असा रागानं त्यांनी आम्हाला शाप दिला. तेव्हा दुःखानं व्याकुळ होऊन मी मतंग मुनींचे पाय धरून त्यांची प्रार्थना केली. तेव्हा ते म्हणाले, 'विद्याधरेश्वर नरवाहनदत्ताने हत्तीणीच्या वेगानं जेव्हा दोन वेगवान घोड्यांना जिंकलेले तू पाहशील तेव्हा शापाचा अंत होऊन तुझी वेला तुला पुन्हा प्राप्त होईल !' असे म्हणून स्नानादि आन्हिक संपवून मतंगमुनी श्रीहरिदर्शनाकरिता आकाशमार्गे श्वेतद्वीपास गेले. नंदर वेलेला आपुले अमूल्य रत्नभांडार देऊन यमुनाही तिकडेच गेली.

आता आश्रमात राहण्याचा मला कंटाळा आला होता व शापाप्रमाणं वेलेचा वियोग होईल ही भीती वाटत होतीच. म्हणून परत आपल्या द्वीपाकडं जाण्यासाठी मी वेलेसह निघालो. समुद्रकाठानं प्रवास करीत असता आम्हाला

एक व्यापारी नौका दिसली. त्या नौकेवर प्रथम मी वेलेला चढविले. नंतर मी वर चढणार तोच एकदम सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने ती नौका दूरवर सागरात नेली. तेव्हा भार्यावियोगदुःखानं मी मूर्च्छित होऊन पडलो. त्यावेळी तिथं आलेल्या एका साधूनं मला सावध करून आपल्या आश्रमात नेले. माझी सर्व हकीकत विचारून त्यानं मला खूप धीर दिला.

काही दिवसांनी माझ्याप्रमाणेच समुद्रात नौका फुटून वाचलेल्या एका व्यापाऱ्याची व माझी भेट झाली. त्याच्यासह मी वेलेचा शोध करीत भटकू लागलो. आज ना उद्या शापाची अखेर होणार या आशेवर जगत मी किती तरी दिवस पुष्कळ देशांतून भटकत अखेर या वैशाख नगरास आलो. इथं, वत्सेश्वरतनय नरवाहनदत्त आला आहे, असं ऐकलं. आणि हत्तीणीवर बसून तू चपळ घोड्यांच्या जोडीला जिंकलेलं दुरून पाहिलं. त्यामुळं माझा शाप संपला म्हणून मला फार समाधान वाटलं. तेवढ्यात एका सज्जन व्यापाऱ्याबरोबर, यमुनेनं दिलेलं रत्नभांडार हाती घेऊन येत असलेली माझी प्रिय भार्या वेला मला दिसली. तेव्हा मला अवर्णनीय आनंद झाला. अशा रीतीनं मला पुन्हा तिची प्राप्ती झाली. म्हणून, वत्सेशनंदना, मी तुला वंदन करण्याकरिता इथं आलो आहे. आता मी भार्येला बरोबर घेऊन पुन्हा आपल्या देशाला जातो.''


अशी आपली अद्भुत हकीकत नरवाहनदत्तास सांगून चंद्रसार निघून गेला. तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या रुचिरदेवाची नरवाहनदत्तावर जास्तच भक्ति जडली. नरवाहनदत्ताला अनुरूप असलेली आपली भगिनी जयेंद्रसेना त्याला अर्पण करावी असे पूर्वीपासूनच रुचिरदेवाच्या मनात होते. त्याप्रमाणे त्याने आपली वेगवान हत्तीण, व जिंकलेले दोन उत्कृष्ट घोडे यांच्यासह जयेंद्रसेना मोठ्या थाटामाटाने नरवाहनदत्ताच्या स्वाधीन केली. नंतर सर्वांना घेऊन नरवाहनदत्त रुचिरदेवाला विचारून आपल्या कौशांबी नगरास परत गेला.

# शापित श्रीदर्शन

फार फार वर्षापूर्वी आपल्या भारत देशात त्रिगर्ता नावाची एक रम्य व विशाल नगरी होती. त्या नगरीतले नागरिक विद्यावंत व गुणवंत होते. तसाच पवित्रधर नावाचा एक तरुण विप्र होता. त्याच्या घराच्या आसपास श्रीमंत लोकांची वस्ती होती. पवित्रधर कुलवंत, शीलवंत व मनाने श्रीमंत होता पण धनाने गरीब होता. त्याच्यावर लक्ष्मीची कृपा झालेली नव्हती, कारण तो स्वाभिमानी असल्यामुळे त्याला सेवावृत्ती आवडत नव्हती. कोणाकडून दान स्वीकारणेही पसंत नव्हते. त्याला वाटे, आपण श्रीमंतांच्या वस्तीत राहाणे योग्य नाही. प्रथम धनवंत झाले पाहिजे.

त्यासंबंधी विचार करीत असतांना पवित्रधराला आपल्या गुरूने दिलेल्या यक्षिणीच्या मंत्राची आठवण झाली. यक्ष, यक्षिणीजवळ नाना प्रकारच्या सिद्धी असतात. त्यांना प्रसन्न करून घेतले म्हणजे ते आपल्या सिद्धीच्या प्रभावाने अपार संपत्तीबरोबरच नाना प्रकारची सुखे प्राप्त करून देतात हे पवित्रधर जाणून होता. तेव्हा आपल्या कार्यसिद्धीकरिता गुरुमंत्राने एखाद्या यक्षिणीला प्रसन्न करून घ्यावे म्हणून तो एका घनदाट अरण्यात गेला. तेथे त्याने एकनिष्ठेने मंत्रजप व अनुष्ठान केले. त्यायोगे सौदामिनी नावाची एक यक्षीण त्याच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्याची भार्या होण्याचे मान्य केले. तिने आपल्या सिद्धीच्या प्रभावाने पवित्रधराला खूप श्रीमंत केले. तेव्हा तो धनवंतांनाही लाजवीत एका प्रशस्त सुखसंपन्न प्रासादात सौदामिनीसह मोठ्या आनंदाने राहू लागला.

अशा प्रकारे चारपाच वर्षे पवित्रधर व सौदामिनी यांचा मोठ्या सुखाचा संसार झाला. पण पुत्रप्राप्ती न झाल्यामुळे आता पितृऋणातून कसे मुक्त व्हायचे याची चिंता वाटून पवित्रधर दिवसेंदिवस उदास व खिन्न होऊ लागला. तेव्हा सौदामिनीने त्याची मनःस्थिती ओळखली. ती पवित्रधराला म्हणाली, 'महाराज, तुम्ही मुळीच चिंता करू नका आणि उदासही राहू नका.



लवकरच आपणास पुत्र होईल व तो पृथ्वीपती होईल !' असे सौदामिनीचे शब्द ऐकताच पवित्रधराला फार आनंद झाला. त्याचा सौदामिनीवर पूर्ण विश्वास होता. तरीसुद्धा त्याने विचारले, 'एवढं कसं तुला कळलं ?' 'ते सांगते ऐका !' असे म्हणून सौदामिनी स्वतःची हकीकत सांगू लागली. ती म्हणाली.

"महाराज, पृथुदर नावाच्या सुप्रसिद्ध यक्षाची मी एकुलती एक कन्या आहे. एकदा मी माझ्या सखीसह दूरच्या पर्वतावरील एका दिव्य व रमणीय उपवनात क्रीडा करण्यासाठी गेले होते. त्यावेळी तिथं मी अट्टहास नावाच्या एका यक्षपुत्राला पाहिले. त्याच वेळी त्याचीही माझ्याकडं नजर गेली. आमच्या सुंदर रूपांनी आम्ही एकमेकांच्या नजरा आकर्षित केल्या. हे वृत्त माझ्या पित्याला समजलं. अट्टहास मला सर्वतोपरी अनुरूप आहे असं त्याला वाटलं आणि त्यानं अट्टहासाला बोलावून घेऊन आमचा विवाह निश्चित केला. नंतर माझ्याप्रमाणेच फार आनंदित झालेला अट्टहास आपल्या घराकडे निघून गेला."

पुढे दोन दिवसांनी माझी सखी अत्यंत खिन्न होऊन माझ्याकडं आली. जेव्हा तिच्या खिन्नतेचं कारण मी तिला विचारलं, तेव्हा ती मला

म्हणाली, 'सौदामिनी, तुला ऐकून वाईट वाटेल अशीच वार्ता सांगण्याची माझ्यावर पाळी आलीय्. जे डोळ्यांनी पाहिलं अन् कानांनी ऐकलं ते आता सांगते, ऐक. तुझ्याबद्दल वाटणाऱ्या उत्सुकतेमुळं बेचैन झालेला तुझा प्रिय अट्टहास आपल्या मित्राबरोबर हिमालयाच्या शिखरावरल्या चित्रस्थल नांवाच्या उद्यानात खेळत होता. त्या खेळात त्याच्या मित्रांनी त्याला यक्षराज कुबेर केलं आणि त्याच्या दीप्तिशिख नावाच्या भावाला राजपुत्र नलकुबर केलं.' त्याच वेळी नलकुबर आकाशातून जात होता. त्यानं तो प्रसंग पाहिला. त्याला वाटले, हे लोक आपली व आपल्या वडिलांची थट्टामस्करी करीत आहेत, म्हणून खाली उतरून तो संतापानं अट्टहासाला म्हणाला, 'मूर्खा, तू आमचा सेवक असून माझी आणि माझ्या वडिलांची चेष्टा करतोस ? श्रेष्ठ पदाची इच्छा करणाऱ्या उद्धटा, तू मृत्युलोकी जन्म घेशील.' अशी नलकुबराची शापवाणी ऐकताच अत्यंत दुःखित झालेला अट्टहास त्याची विनवणी करून म्हणाला, 'आमचा मुळीच तसा हेतू नव्हता. उदास झालेलं मन रमविण्यासाठी माझ्याकडून ती गोष्ट घडली.'

अट्टहासाचं बोलणं खरं आहे असे नलकुबरानं अंतर्ज्ञानाने जाणलं. तो म्हणाला, 'जिचा तुला ध्यास लागला आहे तीच सौदामिनी तुला मनुष्य जन्मात लाभेल. हा तुझा भाऊ दीप्तिशिख तिच्या उदरी जन्म घेईल. तो पृथ्वीपती होईल. नंतर तुला यक्षरूप लाभून तू पुन्हा सौदामिनीसह यक्षलोकी परत येशील!' असे बोलून नलकुबर निघून गेला. शापामुळं अट्टहास कुठं नाहीसा झाला. आणि या घटनेला साक्षी असलेली मी मोठ्या दुःखित अंतःकरणानं तुझ्याकडं आले!'

असे सखीचे वज्राघातासारखं बोलण ऐकून माझ्या दुःखाला पारावार राहिला नाही. आईवडिलांनी माझं खूप सांत्वन केलं. अखेर अट्टहासाच्या पुनर्भेटीच्या आशेने मी दिवस कंठीत राहिले. महाराज, तो अट्टहास म्हणजेच आपण! आपल्या मंत्रसामर्थ्यानं पुन्हा आपली व माझी भेट झाली. आपण पुत्राच्या प्राप्तीबद्दल उदास होऊ नका. लवकरच ते सुख आपणास लाभेल!'' अशा सौदामिनीच्या आश्वासनाने पवित्रधर निश्चिंत झाला.

यथावकाश सौदामिनीने एका तेजस्वी पुत्राला जन्म दिला. त्या पुत्राचे मुखावलोकन करताच पवित्रधराचा स्वरूप सुंदर अट्टहास यक्ष झाला. त्याच्या

पूर्वजन्मीच्या साऱ्या आठवणी जाग्या झाल्या. तो सौदामिनीला म्हणाला, 'प्रिये, पितृऋणातून व शापातून आता मी मुक्त झालो आहे. तेव्हा आपण यक्षलोकी जाऊ!' असे अट्टहासाचे बोलणे ऐकून सौदामिनी म्हणाली, 'आपल्या लहान बाळाची योग्य ती व्यवस्था झाल्याशिवाय आपणास तिकडं कसं जाता येईल ?' तेव्हा थोडा वेळ स्तब्ध राहून अट्टहास म्हणाला, "या नगरात देवदर्शन नावाचा एक ब्राह्मण राहतो. त्यानं धन व पुत्र यांच्यासाठी अग्नीची प्रखर उपासना केली. त्या उपासनेनं प्रसन्न होऊन अग्नी नारायण त्याला म्हणाला, 'तुझ्या भाग्यात पोटचा मुलगा नाही. पण तुला एक मानलेला पुत्र लाभेल. त्याच्या प्रभावानं तुला खूप धन प्राप्त होऊन तुझी गरिबी नाहीशी होईल.' असा अग्नीचा कृपाप्रसाद लाभलेल्या त्या देवदर्शनाला आपण खूप धनासह आपला पुत्र देऊ. म्हणजे पुत्रवंत व धनवंत होण्याची त्याची इच्छा पूर्ण होईल. तो आपल्या पुत्राचं उत्तम प्रकारे पालनपोषण करून त्याला मोठं करील." असे अट्टहासाचे सांगणे अखेर सौदामिनीने मान्य केले.

त्याप्रमाणे मध्यरात्री अट्टहास बालकासह गुप्तपणे देवदर्शनाच्या घरी गेला. त्याने त्या बालकाला गाढ झोपलेल्या ब्राह्मण पतिपत्नीजवळ झोपविले. त्याच्या शेजारी सोन्याने भरलेला एक कलश ठेवला. नंतर त्या मुलाच्या गळ्यात एक मौल्यवान रत्नहार घालून अट्टहास आपल्या घरी परतला आणि पहाटे सौदामिनीसह यक्षलोकी निघून गेला.

त्याच वेळी तिकडे जागृत झालेल्या देवदर्शन व त्याच्या पत्नीला आपल्या शेजारी शांत झोपलेले रत्नहारमंडित तेजस्वी बालक व त्याच्या जवळच ठेवलेला सुवर्णकलश पाहून अतिशय आश्चर्य वाटण्याबरोबर परमानंदही झाला. अग्निदेवतेनेच आपल्याला पुत्रासह अपार धन दिले अशा भक्तिभावनेने त्यांची हृदये भरून आली. नंतर देवदर्शनाने आपल्या आप्तजनांसह पुत्रप्राप्तीचा उत्सव मोठ्या थाटामाटने साजरा करून त्या पुत्राचे नाव 'श्रीदर्शन' असे ठेवले. त्याच्या पायगुणाने देवदर्शनाला यज्ञयागादि धार्मिक कृत्यांमध्ये पुष्कळ द्रव्य प्राप्त होऊन तो सुखी झाला.

देवदर्शन व त्याची पत्नी यांच्या प्रेमळ लालनपालनाने श्रीदर्शन दिवसेंदिवस वाढू लागला. आश्रमात गुरुगृही राहून त्याने वेदविद्येत व शस्त्रास्त्र विद्येत प्रभुत्व मिळविले. त्याने तारुण्यात पदार्पण केल्यावर देवदर्शनाने सारी

गृहव्यवस्था त्याच्यावर सोपविली आणि तो पत्नीसह तीर्थयात्रेला निघून गेला. दुर्दैवाने प्रयागक्षेत्री त्याचा देहांत झाला तेव्हा त्याच्याबरोबर पत्नीने सहगमन केले. ती वार्ता श्रीदर्शनाला कळताच मातापित्यांच्या वियोगाने त्याला फार दुःख झाले. आता त्याला तरुणपणी मार्गदर्शन करण्यास कोणीच वडीलधारे माणूस उरले नाही.

त्यामुळे दुर्दैवाने येऊ नये तीच वेळ अखेर त्याच्यावर आली. श्रीदर्शन जुगारी मित्रांच्या संगतीने जुगार खेळू लागला. त्या भयंकर व्यसनात त्याने आपल्याजववळची सर्व संपत्ती घालविली. आणि अखेर तो कफल्लक झाला. अन्नाला व वस्त्राला महाग झाला. फाटकी व जीर्ण वस्त्रे परिधान केलेल्या त्याला उपास पडू लागले. कोणाजवळ काही मागावे अशी त्याची वृत्तीच नव्हती. त्यामुळे त्याचे फार हाल होऊ लागले. अंगावर धड वस्त्र नसल्याने द्यूतशाळेबाहेर पडण्याची त्याला लाज वाटत होती. म्हणून तो उपाशी अवस्थेत तिथेच पडून राहिला. तेव्हा त्याचा एक जुगारी मित्र मुखरक त्याला म्हणाला, 'मित्रा, जुगाऱ्याच्या नशिबी अखेर हालअपेष्टाच असतात. पण अन्नपाण्याविना राहून तू आपल्या बहुमोल जीवनाचा व्यर्थ नाश का करून घेत आहेस ? अरे, जिवंत राहून मनुष्याला प्रयत्नानं मिळविता येत नाही, असे काय आहे ? भाग्यवंत खिन्न न होता विपत्तीतही धैर्य धारण करतात आणि प्रयत्नानं आपली पूर्वीची परिस्थिती प्राप्त करून घेतात. तू सुलक्षणी आहेस. तेव्हा तुझं निश्चितच कल्याण होईल !'

असे मुखरकाचे शब्द ऐकून श्रीदर्शन त्याला म्हणाला, 'मित्रा, तुझं म्हणणं योग्य आहे. अशा परिस्थितीत द्यूतशाळेबाहेर जाण्याची मला लाज वाटते. आज रात्रीच तू माझ्याबरोबर दुसऱ्या देशाला येण्याचं वचन देत असशील तर तुझं जेवणाचं आमंत्रण मी स्वीकारतो. पण कृपा करून मला इथंच जेवण आणून दे !' 'ठीक आहे', असे म्हणून मुखरकाने घरी जाऊन जेवणाचे खाद्यपदार्थ श्रीदर्शनाला आणून दिले. ते थोडेफार खाऊन झाल्यानंतर थोड्या वेळाने श्रीदर्शन मुखरकासह दुसऱ्या देशाला जाण्यासाठी प्रवासाला निघाला.

त्यांचा प्रवास चालू असताना श्रीदर्शनाच्या सुदैवाने त्याचवेळी आकाशातून अट्टहास सौदामिनीसह चालला होता. त्याची नजर श्रीदर्शनाकडे

जाताच तो आपला पुत्र आहे असे त्याने अंतर्ज्ञानाने जाणले. त्याची निर्धन व अगतिक अवस्था पाहून अट्टहास व सौदामिनी यांना फार वाईट वाटले. त्या अवस्थेतून त्याची सुटका होण्यास साह्य व्हावे म्हणून अट्टहास आकाशात अदृश्य राहून मोठ्यांदा म्हणाला, 'श्रीदर्शना, तुझ्या आईनं घरात पुष्कळ सोन्याचे अलंकार पुरून ठेवले आहेत. ते तू घरी जाऊन हस्तगत कर. नंतर मालव देशाला जा. तेथील श्रीसेन नावाच्या राजानं द्यूतकारांकरिता एक मोठा मठ बांधला आहे. तिथे द्यूतकारांना फुकट राहायला व जेवायला मिळते. तिथं तू जा म्हणजे तुझं कल्याण होईल!'

अशी आकाशवाणी ऐकून श्रीदर्शन मुखरकासह आपल्या घरी परत गेला. घरातील जमीन खणून काढताच त्याला तिथे पुष्कळ सोन्याचे अलंकार सांपडले. हा ईश्वरी कृपाप्रसाद आपल्याला प्राप्त झाला अस वाटून त्याला फार आनंद झाला. ते सर्व अलंकार घेऊन तो लगेच मुखरकासह थेट मालव देशाकडे निघाला. ती रात्र व दुसरा दिवस प्रवास करून ते दोघे संध्याकाळच्या सुमारास बहुसस्य नावाच्या एका गावाजवळ येऊन पोहोचले. तेव्हा गावच्या वेशीपाशी असलेले एक सुंदर सरोवर त्यांना दिसले. त्या सरोवराकाठी थोडा वेळ बसून प्रवासाचा शीण घालवावा आणि नंतर रात्रीच्या मुक्कामाकररिता गावात जावे असे त्यांनी ठरविले.

त्याप्रमाणे श्रीदर्शन व मुखरक सरोवराकडे गेले. तिथे हात पाय धुऊन त्या सरावराचे थंड पाणी पिताच त्यांना खूप प्रसन्न वाटले. ते गप्पागोष्टी करीत तिथे बसले असताना एक स्वरूपसुंदर स्त्री पाणी नेण्यासाठी त्या सरोवरापाशी आली. तिची नजर त्या दोघांकडे गेली. श्रीदर्शनाच्या देखणेपणाने तिला आकर्षित केले. ही नवखी माणसे कोण ते जाणून घेण्याच्या हेतूने ती त्यांच्यापाशी गेली आणि म्हणाली, 'महाभाग, कोठून आपणास दुर्बुद्धी झाली आणि आपण इथं आलात ? आपण इथं फार वेळ थांबलात, तर अग्नीत उडी घेणाऱ्या पतंगाप्रमाणं आपली स्थिती होईल!' असा तिचा घाबरवून सोडणारा प्रश्न ऐकून मुखरकाने तिला विचारले, 'हे कल्याणी, तू कुणाची कोण? तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ?'

तेव्हा ती म्हणाली, 'ते थोडक्यात सांगते ऐका. सुघोष गावच्या पद्मगर्भ नावाच्या एका श्रेष्ठ ब्राह्मणाची मी मुलगी. माझं नावं पद्मिष्ठा. माझ्या

मुखरक नावाच्या भावाला जुगाराचे व्यसन लागून तो परदेशी गेला. त्यामुळं आईला फार दुःख झाले. ती देवाघरी गेली. तेंव्हा मला बरोबर घेऊन माझा पिता मुखरकाच्या शोधार्थ गावोगाव भटकू लागला. प्रवासात चोरांनी आमच्यावर हल्ला केला. त्यांनी माझ्या पित्याला मारून टाकले. आणि मला आपल्या वसुभूती नावाच्या नायकाच्या स्वाधीन केले. तो मला आपली सून करून घेणार आहे. पण त्याचा मुलगा चोरासह दरवडा घालण्यासाठी गेला आहे. म्हणून मी तूर्त सुरक्षित आहे. हे चोरांचं गाव आहे. वसुभूती तिथंच राहतो. कुणीही प्रवासी दिसला की त्याला लुटून मारून टाकायचं अशी येथील चोरांची रीत आहे. म्हणून म्हणते. आपण अजून कुणाच्या नजरेस पडला नाही; तोपर्यंतच इथून निघून जाऊन आपले प्राण वाचवा!'

पद्मिष्ठा आपली हकीकत सांगत असताना मुखरक आपले डोळे एकसारखे पुशीत होता. तिची हकीकत संपताच तो स्फुंदत म्हणाला, 'पद्मिष्ठे, आपल्या कुटुंबाचा नाश करणारा मीच तो तुझा दुर्दैवी भाऊ, मुखरक!' असे शब्द ऐकताच प्रथम पद्मिष्ठा गोंधळून गेली. नंतर तिने आपल्या भावास ओळखले. आणि ती दोघेही आपल्या मातापित्यांकरिता शोक करू लागली. तेव्हा श्रीदर्शन त्या दोघांचे सांत्वन करून म्हणाला, 'आता दुःख आवरून धीर धरा. प्रत्येक क्षण मोलाचा आहे. नाहीतर आपणावर प्राणसंकट ओढवेल!' तेव्हा त्या बहीणभावांनी आपला शोक आवरला. आणि सर्वांनी मिळून चोरांच्या प्राणसंकटातून मुक्त होण्याकरिता एक योजना निश्चित केली.

त्याप्रमाणे अत्यंत आजारी असल्याची श्रीदर्शनाने बतावणी केली. मुखरक त्याची शुश्रूषा करू लागला. पद्मिष्ठा वसुभूतीकडे जाऊन त्याला म्हणाली, 'सरोवराकाठी, एक अत्यंत आजारी माणूस पडलेला आहे. आणि त्याचा मित्र त्याची देखभाल करीत आहे.' तेव्हा वसुभूतीने आपला एक सेवक तिकडे पाठविला. त्याला पाहताच मुखरक मोठ्यांदा रडू लागला. सेवकाने त्याला रडण्याचे कारण विचारताच तो म्हणाला, 'काय सांगू बाबा, हा इथं निश्चेष्ट पडलेला माझा थोरला भाऊ. तीर्थयात्रेच्या प्रवासात रोगग्रस्त झाला. आज एकही पाऊल पुढं टाकण्याचं त्याच्या अंगात त्राण राहिलं नाही. आता आपण यातून वाचत नाही असं त्याला वाटतं म्हणून आपल्याजवळ जे थोडं द्रव्य आहे ते एखाद्या सत्पात्र ब्राह्मणाला दान द्यावं अशी त्याची अखेरची इच्छा

आहे. तेव्हा कृपा करून जवळच्या गावातून एक चांगला ब्राह्मण लवकर बोलावून आणा. कारण त्याची आजची रात्र काही उजाडणार नाही. तसे झाले म्हणजे मीही अग्निप्रवेश करणार आहे!'

असे मुखरकाचे करुण बोलणे ऐकून त्या सेवकाच्या मनात दया उत्पन्न झाली. त्याने गावात जाऊन वसुभूतीला सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हा तो म्हणाला, 'ज्याचं द्रव्य घ्यायचं ते त्याला मारूनच घेतले म्हणजे कोणत्याही प्रकारची भीती राहात नाही, अशी आपली रीत नाही का;' 'पण तो माणूस मरायलाच टेकला आहे. तेव्हा त्याची कृपा करून हत्या करू नये'. तो सेवक म्हणाला, 'तो दान म्हणून जे द्रव्य देतोय ते घ्यायला काय हरकत आहे? समजा, तो उद्या सकाळपर्यंत जिवंत राहिला तर त्याच्या भावासह मारून टाकू, म्हणजे झालं!' असे सेवकाचे बोलणे वसुभूतीला पटून तो रात्री सरोवराकडे निघाला. तोपर्यंत श्रीदर्शनाने फार थोडे द्रव्य स्वतःजवळ ठेवून उरलेले सर्व एका झुडूपाआड दडवून ठेवले होते. रात्री ब्राह्मणवेषधारी वसुभूती जवळ येताच त्याने कण्हत आपल्याजवळचे द्रव्य वसुभूतीला दिले आणि अस्पष्ट असं काहीतरी तो बोलला. आशीर्वाद दिल्यासारखे करून ते द्रव्य घेऊन वसुभूती निघून गेला.

चहूकडे निजानीज व शांतता झाल्यावर मध्यरात्री पद्मिष्ठा गुपचूपपणे तिथे आली. तेव्हा श्रीदर्शनाने झुडूपाआडचे आपले सर्व द्रव्य काढून घेतले. नंतर तो, मुखरक व पद्मिष्ठा चोरापासून सुरक्षित अशा वेगळ्या वाटेने झपाट्याने मालव देशाकडे निघाले.

उरलेली रात्र व दुसरा दिवस सतत प्रवास करून दमलेभागलेले ते तिघे संध्याकाळच्या सुमारास एका घनदाट अरण्यात शिरून विश्रांतीसाठी एका मोठ्या पिंपळवृक्षाखाली बसले. त्यांना खूप भूक व तहान लागली होती. रात्रीच्या वेळी हिंस्त्र पशूंच्या आरोळ्या त्यांच्या कानी पडू लागल्या तशात चोरांच्या हल्ल्यांचीही त्यांना भीती वाटत होती. आता काय करावे अशा विचारात ते असतानाच दूरवर त्यांना एक अग्निज्वाळा दिसली. तेव्हा श्रीदर्शन मुखरकाला म्हणाला, 'मित्रा, अग्निज्वाळा दिसते त्या ठिकाणी लोकवस्ती असावी. मी तिथं जाऊन अन्नपाणी मिळतं का ते पाहतो. तोपर्यंत तुम्ही दोघं इथून हलू नका!'

असे म्हणून श्रीदर्शन अग्निज्वाळेच्या दिशेने चालू लागला.तिथे पोहोचताच त्याला एक रत्नजडित भव्य वाडा दिसला. त्या रत्नांचेच तेज दुरून अग्निज्वाळेसारखे दिसत होते. साहसी व निर्भय श्रीदर्शन सरळ वाड्यात शिरला. तिथे त्याने यक्षांच्या मेळाव्यात बसलेली एक दिव्य यक्षीण पाहिली. तेव्हा त्याने थेट तिच्याजवळ जाऊन अतिथी म्हणून अन्नपाण्याची विनंती केली. श्रीदर्शनाची निर्भय वृत्ती पाहून यक्षीण त्याच्यावर प्रसन्न झाली. तिने त्याला हवे तेवढे अन्नपाणी दिले. ते नेण्याकरिता त्या यक्षिणीने श्रीदर्शनाबरोबर आपला एक यक्ष दिला. त्या यक्षाने श्रीदर्शनाला इच्छित स्थळी पोहोचविले. आणि तो निघून गेला. नंतर त्या तिघांनी त्या दिव्य अन्नपाण्याचे भरपूर सेवन केले. श्रीदर्शनाचे असामान्य धैर्य पाहून मुखरक विस्मित झाला तर पद्मिष्ठेचे त्याच्यावर जास्तच प्रेम जडले. भोजनानंतर गप्पागोष्टींच्या ओघात मुखरक त्याला म्हणाला, 'मित्रा, पद्मिष्ठेला तूच अनुरूप असल्यानं तू तिचा स्वीकार करावा अशी माझी तुला आग्रहाची विनंती आहे. ती तू मान्य केलीस तर माझ्याप्रमाणं तिलाही परमानंद होणार आहे.' असे मुखरकाचे शब्द ऐकून श्रीदर्शन म्हणाला, 'मित्रा, तुझी विनंती मी नेहमीच मान्य करीत आलो आहे. योग्य स्थानी, योग्य वेळी मी तुझ्या बहिणीशी अवश्य यथाशास्त्र विवाह करीन त्याबद्दल तू निश्चिंत रहा.' असे श्रीदर्शनाचे आश्वासन ऐकून मुखरक व पद्मिष्ठा यांना खूप आनंद झाला. नंतर उरलेली रात्र त्या तिघांनी प्रेमळ गप्पागोष्टी करीत पिंपळवृक्षाखालीच घालविली.

सकाळ होताच मालव देशाच्या दिशेने पुन्हा त्या तिघांचा पुढे प्रवास सुरू झाला. लवकरच ते त्या देशाच्या मुख्य नगरात येऊन पोहोचले. तेव्हा संध्याकाळ झाली होती. म्हणून मठाचा शोध करीत न बसता त्यांनी वेशीलगतच असलेल्या एका वृद्ध ब्राह्मण स्त्रीच्या घरी मुक्काम केला. तिला आपले नाव गाव सांगितले. तेव्हा तिने त्यांचे चांगले आदरातिथ्य केले. पण तिच्या मुद्रेवरची खिन्नता श्रीदर्शनाच्या लक्षात येताच त्याने त्या खिन्नतेचे कारण ब्राह्मण स्त्रीला विचारले. तेव्हा ती म्हणाली, 'बाबा रे, राजसेव त असलेला माझा पती निपुत्रिक मरण पावला. तेव्हा येथील दयाळू राजाने पतीच्या वेतनाचा एक चतुर्थांश दरवर्षी मला देण्याचं मान्य केलं. पण आता तो राजाच क्षयरोगानं आजारी झाला आहे. एखादा धाडसी महावीर मला मदत करण्यास तयार असेल तर वेताळाला प्रसन्न करून मी आपला रोग बरा करीन असं महाराजांना एका

मांत्रिकानं सांगितलं आहे. तसा वीर मिळाला नाही आणि राजाचं काही बरं वाईट झालं तर मला उपाशीच मरायची पाळी येईल म्हणून मला चिंता वाटते !'

असे त्या वृद्ध स्त्रीचे शब्द ऐकून श्रीदर्शन तिला म्हणाला, 'आजी, तुम्ही मुळीच चिंता करू नका. मी त्या मांत्रिकाला मदत करायला तयार आहे. उद्या सकाळीच मला राजाच्या भेटीस न्या !' त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी त्या वृद्धेने श्रीदर्शनाला राजवाड्यात नेले. तिथे राजाची भेट होताच त्याला वंदन करून श्रीदर्शनाने आपल्या येण्याचा हेतू सांगितला. तेव्हा राजाला फार आनंद झाला. त्याने ताबडतोब मांत्रिकाला बोलावून घेतले. त्याने तिथे येताच श्रीदर्शनाला न्याहाळून पाहिले. नंतर तो श्रीदर्शनाला म्हणाला, 'हे वीरा, वेताळाला बोलावण्याचं काम तुला करायचं आहे. आज कृष्ण चतुर्दशी आहे. तेव्हा रात्री सिद्धीकरिता तू स्मशानात माझी भेट घे !'

याप्रमाणे त्या मांत्रिकाने सांगितल्याप्रमाणे रात्री निर्भय श्रीदर्शन हातात तलवार घेऊन स्मशानात गेला. तिथे मांत्रिकाने सांगितल्याप्रमाणे तो वेताळास बोलावण्याकरिता जाताच वेताळाने श्रीदर्शनाची कडक परीक्षा घेतली. आणि त्याच्या अलौकिक धैर्य व दातृत्व या गुणांवर खूश होऊन तो वेताळ श्रीदर्शनाबरोबर मांत्रिकाकडे येण्यास निघाला. मांत्रिकाजवळ येताच त्याने भयंकर रूप धारण केले. ते पाहून मांत्रिक घाबरून पळून जाऊ लागला. तेव्हा वेताळाने त्या भित्र्या मांत्रिकाला खाऊन टाकले आणि श्रीदर्शनाला काही मोहऱ्या देऊन तो त्याला म्हणाला, 'या मोहऱ्या राजाच्या मस्तकावर व दंडावर बांध म्हणजे त्याचा क्षयरोग नाहीसा होईल आणि राजा तुझं कल्याण करील !' 'पण राजानं मांत्रिकाबद्दल मला विचारले तर ?' श्रीदर्शनाने विचारले. तेव्हा वेताळ म्हणाला, 'ज्या प्रेताच्या अंगात शिरून मी सध्या तुझ्याशी बोलतो ते प्रेत फाडून राजाला दाखव म्हणजे झालं.' असे म्हणून वेताळाने प्रेताचा त्याग केला. नंतर श्रीदर्शन घरी परत गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने राजाची भेट घेऊन त्याला आदल्या रात्री घडलेली सगळी हकीकत सांगितली. त्याप्रमाणे राजाने मांत्रिकाबद्दल स्वतःची खात्री करून घेतली. नंतर श्रीदर्शनाने वेताळाने दिलेल्या मोहऱ्या राजाच्या डोक्यावर व दंडावर बांधताच तो रोगमुक्त झाला. राजाला मुलगा नव्हता. तेव्हा आपणास संजीवन देणाऱ्या श्रीदर्शनालाच त्याने आपला पुत्र

मानले आणि मोठ्या थाटामाटाने त्याने त्याला युवराजपद दिले. नंतर श्रीदर्शनाने पद्मिष्ठेशी विवाह केला. आपल्या प्रिय मुखरक मित्राला मंत्री केले. आणि आपला धर्मपिता श्रीसेन याच्या सल्ल्यानुसार तो मालव देशाचे राज्य करू लागला.

एके दिवशी दूरवर प्रवास करून आलेल्या उपेंद्रशक्ती नावाच्या एका मोठ्या व्यापाऱ्याने समुद्रकाठी सापडलेली एक रत्नजडित गणेशमूर्ती युवराज श्रीदर्शनाला सप्रेम भेट म्हणून दिली. तेव्हा श्रीदर्शनाने त्या मूर्तीला साजेसे एक भव्य व सुंदर मंदिर बांधून तिथे त्या गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. नंतर दररोज श्रीदर्शन मोठ्या भक्तिभावाने गणेशाची उपासना करू लागला. त्याच्या उपासनेने संतुष्ट होऊन गणेश आपल्या गणाना म्हणाला, "श्रीदर्शन माझ्या कृपेने लवकरच सम्राट होणार आहे. हंसद्वीपचा राजा अनंगोदय यांची सुंदर कन्या अनंगमंजिरीही नित्य माझी एकनिष्ठेनं उपासना करून, 'मला सम्राट पती द्यावा' अशी प्रार्थना करते. श्रीदर्शनाशी तिचा विवाह झाला म्हणजे तिची इच्छा पूर्ण होईल. त्यांचा विवाह घडून यावा अशी व्यवस्था मी केली आहे. तसे होण्यात माझी मूर्ती आणून देणाऱ्या उपेंद्रशक्तीचेही कल्याण होणार आहे. तेव्हा माझी तुम्हाला अशी आज्ञा आहे की आज रात्री तुम्ही श्रीदर्शनाला हंसद्वीपात घेऊन जा आणि पहाटे त्याला परत आणा !'

त्याप्रमाणे रात्री सर्वत्र निजानीज झाल्यावर श्री गणेशाच्या गणांनी गुप्तपणे श्रीदर्शनाच्या महालात शिरून त्याचा पलंग उचलला. आणि तो आकाशमार्गाने नेऊन हंसद्वीपात अनंगमंजिरीच्या महालात आणून ठेवला. काही क्षणांनी श्रीदर्शनाला जाग आली. तेव्हा एका अपरिचित रत्नजडित सुसज्ज महालात आपण आहोत असे त्याला आढळून येताच चकित होऊन तो पलंगावर ऊठून बसला. तेवढ्यात त्याची नजर थोड्या अंतरावर असलेल्या एका रत्नजडित मंचकावर झोपलेल्या लावण्यवतीकडे गेली. तेव्हा जास्तच आश्चर्यचकित होऊन तो पलंगावरून खाली उतरून तटस्थ उभा राहिला. 'ही लावण्यवती कोण ? आपण कुठं आलो ?' असे प्रश्न त्याच्या मनात येत आहेत तोच अनंगमंजिरी जागी झाली. तिची नजर श्रीदर्शनाकडे जाताच ती देखील अत्यंत चकित होऊन पलंगावरून खाली उतरली. तिच्या मनात विचार आला, 'चहूकडे कडेकोट पहारा असतानासुद्धा ह दिव्य पुरुष माझ्या महालात आला तेव्हा हा कुणीतरी देव असला पाहिजे' अशा विचाराने थोडे पुढे जाऊन

भीतीयुक्त आदराने तिने श्रीदर्शनाला विचारले, 'आपण कोण व इथं का आला ?' तेव्हा श्रीदर्शनाने तिच्या प्रश्नाचे उत्तर न देता उलट प्रश्न केला, 'तू कोण आणि मी इथं कसा आलो ?' नंतर दोघांनी एकमेकांस आपला देश, नाव, कुल वगैरे माहिती सांगितली. तेव्हा अनुरूप अशी ती दोघे परस्पर अनुरक्त झाली. श्रीगणेशाच्या भक्तीचा कृपाप्रसाद आपल्याला लाभला असे त्यांना वाटले. प्रेमाची खूण म्हणून त्या दोघांनी आपल्या अंगावरली भूषणे एकमेकांना दिली. आणि ते गांधर्व विवाहास तयार झाले. तोच गणेशाच्या गणांनी त्यांना मोह घालून निद्रावश केले. आणि श्रीदर्शनाचा पलंग पूर्ववत् त्याच्या महालात नेऊन ठेवला.

सकाळी श्रीदर्शन जागा होताच रात्रीची घटना म्हणजे एक सुंदर स्वप्न होते असे त्याला वाटले. पण अंगावरल्या भूषणांकडे त्याची दृष्टी जाताच ते सुंदर स्वप्न सत्यच आहे अशी त्याची खात्री होऊन तो बेचैन झाला. त्याने प्रांजळपणे पद्मिष्ठेला सर्व हकीकत सांगितली. तेव्हा तिने त्याला खूप धीर दिला. नंतर श्रीदर्शनाने श्रीसेन राजाला अनंगमंजिरीचे दागिने दाखविले व सर्व वृत्तांत त्याला सांगितला. तेव्हा त्यालाही त्या गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटले. मग श्रीसेन राजाने आपल्या राज्यात सर्वत्र अशी दवंडी पिटविली की ज्याने हंसद्वीप पाहिले आहे त्याने दरबारात हजर व्हावे. पण तसा एकही माणूस मिळाला नाही.

तिकडे हंसद्वीपात अनंगमंजिरीची, श्रीदर्शनासारखीच स्थिती झाली होती. तिने आपल्या अंगावरली श्रीदर्शनाची भूषणे पित्याला दाखवून रात्रीचा वृत्तांत त्याला सांगितला. तेव्हा अनंगोदय राजा फार विस्मित झाला. माणसाच्या बुद्धीला आकलन न होणारे असे हे काही इंद्रजाल असावे असे त्याला वाटले. आता काय करावे हे त्याला सुचेना. तेव्हा राजा ब्रह्मसोम नावाच्या एका महायोग्याकडे गेला आणि घडलेला सर्व चमत्कार राजाने त्याला सांगितला. तेव्हा तसे का घडले ते अंतर्ज्ञानाने जाणून ब्रह्मसोम राजाला म्हणाला, 'राजा, गणेशाच्या आज्ञेनं त्याच्या गणांनी मालवदेशाच्या युवराज श्रीदर्शनाला खरोखरच अनंगमंजिरीच्या महालात आणलं होतं आणि त्यांची ओळख झाल्यावर त्यांना मोहवश करून श्रीदर्शनाला परत त्याच्या राजवाड्यात नेले. गणेशाच्या कृपेनं श्रीदर्शन लवकरच सम्राट होणार आहे. तुझ्या मुलीचीही सम्राट पती मिळावा अशी इच्छा आहे. त्या दृष्टीनं श्रीदर्शन तिला अनुरूप वर आहे.' असे ब्रह्मसोमाचे शब्द ऐकून अनंगोदय राजाला फार आनंद झाला. पण

दुसऱ्या क्षणी चिंताक्रांत होऊन तो म्हणाला, 'योगीराज, हंसद्वीप कुठे आणि मालव देश कुठे ? तेव्हा आपल्या कृपेशिवाय हे कार्य लवकर सिद्धीस जाणार नाही म्हणून आपली कृपा व्हावी ही विनंती !' तेव्हा चिंत्तायुक्त राजाला धीर देऊन ब्रह्मसोम म्हणाला, 'राजा, तू मुळीच काळजी करू नकोस. मी आताच ते कार्य साधण्याच्या प्रयत्नाला सुरवात करतो.' असे म्हणून तो जागच्याजागी गुप्त झाला.

दुसऱ्या क्षणी मालव देशाच्या राजधानीत येऊन पोहोचलेल्या ब्रह्मसोमाने श्रीदर्शनाने स्थापिलेल्या श्रीगणेश मंदिरात प्रवेश केला. व गणेशाचे दर्शन घेऊन तो त्याची प्रार्थना करू लागला. तेवढ्यात अंगावर चिंध्या पांघरलेला, केस पिंजारलेला, मलीन असा एक वेडा बडबडत मंदिरात शिरला. मूर्तीसमोर उभ्या असलेल्या ब्रह्मसोमाला पाहताच तो त्याला धरायला पुढे धावला. तेव्हा ब्रह्मसोमाने त्याला जोराने थप्पड मारली. त्याबरोबर तो एकदम ताळ्यावर आला. आपल्या अंगाकडे नजर जाताच त्याची त्यालाच लाज वाटली. तेव्हा तो तडक आपल्या घराकडे निघून गेला. तो वेडा म्हणजे ज्याने श्रीदर्शनाला गणेशाची मूर्ती आणून दिली त्या उपेंद्रशक्तीचा तो महेंद्रशक्ती नावाच मुलगा होता. त्याला बरेच दिवसांपासून वेड लागलेले होते. आपला मुलगा चांगला शुद्धीवर आलेला पाहताच उपेंद्रशक्तीला अत्यानंद झाला. त्याने महेंद्रशक्तीला स्नान घालून चांगले कपडे घातले आणि त्याच्यासह तो ब्रह्मसोमाच्या दर्शनार्थ गणेश मंदिरात गेला. अत्यंत कृतज्ञ झालेल्या त्या दोघांनी ब्रह्मसोमाला वंदन केले, आणि त्याच्या चरणी पुष्कळ द्रव्य अर्पण केले. पण निरिच्छ अशा त्या महायोग्याने त्याच्याकडे बघितलेही नाही.

ही अद्‌भुत वार्ता श्रीसेन राजाला कळताच तो श्रीदर्शनाला बरोबर घेऊन ब्रह्मसोमाचे दर्शन घेण्याकरिता गणेश मंदिरात गेला. ब्रह्मसोमाला वंदन करून तो म्हणाला, 'योगीराज, आपल्या दर्शनानं आम्ही धन्य झालो आहोत. या माझ्या श्रीदर्शन पुत्रावरही आपली कृपादृष्टी असावी अवढीच माझी प्रार्थना आहे.' तेव्हा ब्रह्मसोम म्हणाला, 'म्हणून तर मी इथं आलोयू.' नंतर श्रीदर्शनाकडे काही क्षण बघून तो हसत पुढे म्हणाला, 'राजा, या चोरानं एका रात्री हंसद्वीपाला जाऊन राजकन्या अनंगमंजिरीचे हृदय व दागिने ही दोन्हीही चोरून आणली आहेत. म्हणून आता मी त्याला हंसद्वीपाकडं घेऊन जातो. लवकरच तो आपल्या अनंगमंजिरी भार्येसह इथं सुखरूप परत येईल. राजा,

तू मुळीच चिंता करू नकोस !' असे म्हणून ब्रह्मसोमाने श्रीदर्शनाचा हात धरला. आणि तो आपल्या योगसामर्थ्याने श्रीदर्शनासह अदृश्य झाला.

नंतर एका क्षणात तो हंसद्वीपाला पोहोचला. तेथे अनंगोदय राजाने त्या दोघांचे अगत्यपूर्वक स्वागत केले. मोठ्या कृतज्ञतेने ब्रह्मसोमाला वंदन करून त्याने त्याची पाद्यपूजा केली. श्रीदर्शनाला पाहून राजाला फार संतोष वाटला. नंतर एका शुभमुहूर्तावर राजाने आपल्या अनंगमंजिरीचा हात श्रीदर्शनाच्या हाती दिला. मग ब्रह्मसोमाच्या योगशक्तीने श्रीदर्शन अनंगमंजिरीसह मालव देशातील आपल्या नगरात परत आला. तेव्हा श्रीसेन राजाने नगरात महोत्सव साजरा केला. पद्मिष्ठा अनंगमंजिरीला आपल्या धाकट्या बहिणीप्रमाणे मानू लागली. श्रीदर्शनाचा सुखी संसार पाहून श्रीसेनाने जगाचा निरोप घेतल्यावर श्रीदर्शन राजा झाला. नंतर त्याने दिग्विजय संपादन करून सर्व राजांना आपल्या छत्राखाली आणले. आणि तो एक प्रबळ सम्राट झाला.

यथावकाश पद्मिष्ठा आणि अनंगमंजिरी यांना मुलगे झाले. तेव्हा श्रीदर्शनाने पुत्रजन्मोत्सव मोठ्या वैभवाने साजरा केला. त्याने पद्मिष्ठेच्या मुलाचे नाव पद्मसेन व अनंगमंजिरीच्या मुलाचे नाव अनंगसेन असे ठेवले. नंतर ते मुलगे कुमार वयात आल्यावर श्रीदर्शनाने त्यांच्या विद्याभ्यासाची योग्य ती व्यवस्ता करून त्यांना वेदविद्या व शस्त्रविद्या यात पारंगत करून घेतले.

पुढे एके दिवशी श्रीदर्शन, पद्मिष्ठा व अनंगमंजिरी यांच्यासह आपल्या महालात बसला असताना बाहेरच्या बाजूस आक्रोश करीत असलेल्या एका ब्राह्मणाचा आवाज त्याच्या कानी पडला. तेव्हा त्याने सत्वर त्या ब्राह्मणाला बोलावून घेऊन त्याला रडण्याचे कारण विचारले. तेव्हा तो ब्राह्मण मोठ्या दुःखाने म्हणाला, 'महाराज, माझ्या घरी ज्योतिलेखा व धूम्रलेखा यांनी युक्त असा जो दीप्तिशिख अग्नी होता त्याचा अट्टहास करणाऱ्या कालमेघानं नाश केला आहे !' एवढे बोलून तो ब्राह्मण एकाएकी अदृश्य झाला आणि त्याच्या बोलण्याचा अर्थ काय यासंबंधी आश्चर्य करीत श्रीदर्शनाने आपल्या राण्यांकडे पाहिले. तेव्हा त्या दोघी अश्रू ढाळीत असतानाच गतप्राण झालेल्या त्याला आढळल्या. मग अनिवार दुःखशोकाने श्रीदर्शन मूर्च्छित होऊन पडला. तेव्हा राजमहालात हाहाःकार उडाला. मुखरक धावतच तेथे आला. त्याने राजाला

सावध केले. राजाने पुत्रांकडे पाहून आपला शोक आवरून त्यांना धीर दिला. नंतर काही महिन्यांनी विरक्त झालेल्या श्रीदर्शनाने आपले सर्व राज्य दोन्ही मुलांना सारखे वाटून दिले. आणि तपश्चर्या करण्यासाठी वनप्रवेश केला.

एके दिवशी श्रीदर्शन वनातून भटकत असता एका मोठ्या वडाच्या झाडापाशी गेला. तेव्हा तेथे त्याला आपल्या हातात कंदमुळे धारण केलेल्या दोन दिव्य स्त्रिया दिसल्या. त्या श्रीदर्शनाजवळ येऊन म्हणाला, 'महाराज, आपण या आमच्या कंदमुळांचा स्वीकार करावा!' 'पण तुम्ही कोण ते आधी मला सांगा', श्रीदर्शन म्हणाला, 'म्हणजे मी तुमच्या आतिथ्याचा स्वीकार करीन.' 'महाराज, आम्ही कोण ते जाणून घेण्याची आपली इच्छा असेल तर इथून अगदीच जवळ असलेल्या आमच्या घरी चला!' अशी त्या स्त्रियांची विनंती मान्य करून श्रीदर्शन त्यांच्यामागाोमाग निघाला. त्याच वडाच्या ढोलीतून तीन चार पायऱ्या उतरून गेल्यावर श्रीदर्शनाला समोर एक सोन्याचा दिव्य प्रासाद दिसला.

त्या प्रासादात गेल्यावर त्या स्त्रियांनी श्रीदर्शनाचे यथायोग्य आदरातिथ्य केले. त्याचा फलाहार झाल्यावर त्या दोघी स्त्रियांपैकी एक म्हणाली, ''महाराज, आता ऐका आमची कथा. पूर्वी प्रतिष्ठान नगरीत कमलगर्भ नावाचा एक द्विप राहात होता. पथ्या व बला या नावाच्या आपल्या दोन भार्यांबरोबर त्यानं सुखानं संसार केला. पुढे म्हातारपण आल्यावर एकमेकांचा वियोग होऊ नये म्हणून, 'जन्मोजन्मी आमचे पती व पत्नी हेच नातं राहावं!' असा अग्नीजवळ वर मागून त्या तिघांनी एकाच वेळी अग्निप्रवेश केला. त्याप्रमाणे कमलगर्भ यक्षयोनीत दीप्तिशिख म्हणून जन्मला. पथ्या व बला या ज्योतिलेखा व मधुलेखा या नावाच्या यक्षकन्या झाल्या. त्यांनी अनुरूप पती मिळावा म्हणून शंकराची उपासना केली. तेव्हा शंकर प्रसन्न होऊन त्यांना म्हणाले, 'मुँलींनो, पूर्वजन्मी अखंड पती पतीपत्नीत्व लाभावं म्हणून ज्याच्या बरोबर तुम्ही अग्निप्रवेश केला तो तुमचा पती यक्षलोकी दीप्तिशिख म्हणून जन्मला पण नलकुबराच्या शापानं त्यानं मृत्युलोकी जन्म घेऊन त्याच्या भार्या व्हा. शाप संपला म्हणजे तुम्ही तिघेही पुन्हा यक्षलोकी याल. जन्मोजन्मी पत्नी व पती असेच तुमचं नातं राहील!' असे म्हणून शंकर अंतर्धान पावले.'' एवढे बोलून ती सुंदरी काही क्षण थांबली. नंतर ती पुढे म्हणाली,

'त्याप्रमाणं ज्योतिलेखा व धूमलेखा यांनी भूलोकावर पद्मिष्ठा व अनंगमंजिरी म्हणून जन्म घेतला. योग्य समयी त्यांचं श्रीदर्शनाशी लग्न झालं. त्याच्यासह त्यांनी पुष्कळ दिवस एकत्र राहून अपार सुख भोगलं. नंतर एके दिवशी दीप्तिशिखाचा थोरला भाऊ अट्टहास ब्राह्मणवेषानं श्रीदर्शनाकडं आला. आणि आक्रोशाच्या निमित्तानं त्यानं मोठ्या युक्तीनं तिघांच्या नावाचा उच्चार करून त्यांना पूर्वजन्माची आठवण करून दिली. तेव्हा लगेच पद्मिष्ठा आणि अनंगमंजिरी यांनी मनुष्यदेहाचा त्याग केला आणि त्या यक्षिणी झाल्या. त्याच दोन यक्षिणी, ज्योतिलेखा व धूमलेखा आम्ही आहोत. आणि आपण दीप्तिशिख आहात!' असे ज्योतिलेखेने सांगताच श्रीदर्शनाला आपल्या पूर्वजन्माची आठवण झाली. त्याबरोबर मनुष्यदेहाचा त्याग करून,तो दीप्तिशिख यक्ष झाला. आणि मोठ्या आनंदाने ज्योतिलेखा व धूमलेखा यांच्यासह त्याने लक्ष लोकाकडे प्रयाण केले.

# अनंगरती कुणाला मिळाली ?

प्राचीन काळी उज्जयिनी नगरात वीरदेव नावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याने आपल्या अंगच्या सद्गुणांनी आपले राज्य वैभवशाली केले होते. तो धर्मशील व प्रजाहितदक्ष असल्याने आपल्या समस्त प्रजेचा तो जीव की प्राण झाला होता. त्याच्या राणीचे नाव पद्मरती असे होते. ती प्रेमळ व पतिपरायण होती. अशा त्या राजाराणीसमोर सर्व सुखे हात जोडून उभी होती. पण पितृऋणातून मुक्त होण्यास आवश्यक असे पुत्र प्राप्तीचे महान सुख अद्याप त्यांना लाभले नव्हते. म्हणून ती दोघे अंतर्यामी खिन्नच होती. तेव्हा इष्ट कार्यासाठीं पद्मरतीसह तपश्चर्या करावी असे वीरदेवाने ठरविले.

त्याप्रमाणे मंदाकिनी नदीच्या तीरावर राहून वीरदेवाने पद्मरतीसह शंकराची मोठ्या भक्तिभावाने उपासना करण्यास आरंभ केला. पुष्कळ दिवस सातत्याने उपासना केल्यावर शंकर प्रसन्न झाले. त्यांनी राजाच्या स्वप्नात येऊन सांगितले, 'राजन्, तुला लवकरच पुत्र होईल. तो आपल्या शौर्यानं तुझ्या कुलाचं नाव उज्ज्वल करील. नंतर तुला एक कन्याही होईल. तिच्या अपूर्व सौंदर्यानं अप्सराही लज्जित होतील !' असा स्वप्नात मिळालेला वर वीरदेवाने सकाळी पद्मरतीला सांगितला. तेव्हा तिलाही फार आनंद झाला. नंतर राजा वीरदेव आपल्या भार्येसह नगरास परत आला.

पुढे काही महिन्यांनी पद्मरतीने एका सुलक्षणी पुत्राला जन्म दिला. त्याचे नाव शूरदेव असे ठेवण्यात आले. त्याच्या पाठीवर जन्म घेतलेल्या मुलीचें नाव राजाने अनंगरती असे ठेवले. कारण ती लावण्यवती होती. दिवसेंदिवस वाढत ती जेव्हा उपवर झाली तेव्हा राजा तिच्याकरिता अनुरूप वर शोधू लागला. त्याने देशोदेशींच्या तरुण राजपुत्रांची चित्रे पटावर काढवून आणली. पण त्यातील एकही राजपुत्र आपल्या कन्येला योग्य आहे असे त्याला वाटले नाही. सगळेच नापसंत ठरले.

खूप प्रयत्न करून सुद्धा जेव्हा राजाला अनंगरतीला साजेसा वर मिळाला नाही तेव्हा एके दिवशी तो तिला म्हणाला, 'मुली, खूप शोध करून सुद्धा मला तुला साजेसा वर लाभला नाही. तेव्हा माझा असा विचार आहे की देशोदेशींच्या राजांना तुझ्या स्वयंवराकरिता निमंत्रणं पाठवावी. त्याप्रमाणं ते आले म्हणजे त्यांच्यापैकी तुला जो पसंत पडेल त्याच्या गळ्यात तू माळ घाल !' असे आपल्या पित्याचे शब्द ऐकून अनंगरती म्हणाली, 'बाबा, स्त्रीसुलभ लज्जेमुळं स्वयंवराची कल्पना मला आवडत नाही. तेव्हा जो देखणा तरुण तुमच्या दृष्टीनं अपूर्व विज्ञान जाणणारा असेल त्यालाच तुम्ही मला अर्पण करा. एवढीच माझी योग्य वराबद्दल अपेक्षा आहे.' अशा आपल्या कन्येच्या पसंतीप्रमाणे राजा वर संशोधन करू लागला.

उज्जयिनीचा राजा वीरदेव आपल्या कन्येकरिता योग्य वर शोधीत आहे ही वार्ता सर्वत्र पसरलेली होती. ती ऐकून दक्षिण देशातले चार देखणे व विज्ञानी तरुण उज्जयिनी नगरात आले. त्यांनी राजाची भेट घेऊन त्याला आपल्या भेटीचे कारण सांगितले. तेव्हा राजाने त्यांचा सत्कार केला. नंतर राजाने अनंगरतीला बोलावणे पाठविले. त्याप्रमाणे अनंगरती तिथे येऊन स्थानापन्न झाल्यावर राजाने पहिल्या तरुणाला विचारले, 'तुम्ही कोण, काय उद्योग करता ?' तेव्हा तो तरुण म्हणाला, 'महाराज, माझं नाव पंचपट्टिक. हे नाव मला अगदी योग्य आहे. कारण दररोज मी उत्तम व भारी वस्त्राच्या पाच जोड्या तयार करतो. त्यापैकी एक मी देवाला अर्पण करतो. दुसरी जोडी मी ब्राह्मणाला देतो, चवथी जोडी मी स्वत:करिता ठेवतो, पत्नी मिळाली म्हणजे मी तिला तिसरी जोडी देईन. उरलेली पाचवी जोडी मी विकतो आणि मिळेल त्या द्रव्याने मी माझा उदरनिर्वाह क तो. असा मी विज्ञानी असल्यानं आपण अनंगरतीचा हात माझ्या हाती द्यावा.'

असे पहिल्या तरुणाचे बोलणे संपल्यानंतर राजाने दुसऱ्या तरुणाला विचारले, 'तुम्ही कोण आणि काय उद्योग करता ?' तेव्हा दुसरा तरुण म्हणाला, 'महाराज, मी भाषाज्ञ नावाचा एक वैश्य आहे. सगळ्या पशूंचा व पक्ष्यांची भाषा मला उत्तम प्रकारे कळते. एवढेच नव्हे तर या अपूर्व विद्येत मी पारंगत

आहे. तेव्हा असे हे असामान्य ज्ञान प्राप्त करून घेणाऱ्या मला आपण अनंगरती द्यावी.'

दुसऱ्या तरुणाने अशी आपल्यासंबंधी माहिती सांगितल्यावर तिसऱ्या तरुणाकडे वळून राजाने त्याला विचारले, 'आता तुम्ही कोण व काय करता ते सांगा.' तेव्हा तिसरा तरुण म्हणाला, 'महाराज, माझं नाव खड्‌गधर. खड्‌गयुद्धात मी अनेकांना जिंकलं आहे. खड्‌गविद्येत माझ्या तोडीचा महावीर या भूमीवर अद्याप जन्मावयाचा आहे. तेव्हा आपण आपल्या कन्येचा माझ्याशी विवाह करावा.' तिसऱ्या तरुणाने स्वतःबद्दल असे सांगितल्यानंतर राजा चवथ्या तरुणाला म्हणाला, 'आता तुम्ही कोण आणि कोणती विशेष ज्ञानप्राप्ती तुम्ही करून घेतली आहे ते सांगा.' तेव्हा तो तरुण म्हणाला, 'जीवदत्त नाव धारण केलेला मी एक ब्राह्मण आहे. मी एक अलौकिक विद्या मोठ्या कष्टानं प्राप्त करून घेतली आहे. तिच्यामुळं निर्जीव जंतूंनाही सजीव करण्याचं महान सामर्थ्य माझ्या ठायी आहे. तेव्हा आपण अनंगरती मलाच अर्पण करावी!'

याप्रमाणे स्वतःच्या अंगी असलेले विलक्षण विज्ञान सांगून त्या चार देखण्या तरुणांनी राजापाशी अनंगरतीची मागणी केली. तेव्हा दुसऱ्या दिवशी निर्णय कळवतो असे म्हणून राजाने त्यांची पाठवणी केली. ते गेल्यावर राजा अनंगरतीसह विचार करू लागला, ' ते चौघे तरुण आपापल्या परीनं योग्यच आहेत. आता त्यांच्यापैकी कुणा एकाची अनुरूप वर म्हणून निवड करावी हा मोठा कठीण प्रश्न आहे. तेव्हा आता काय करावे.' अशा विचारात राजा असताना एक ज्ञानवंत राजभेटीसाठी तिथे आला.

तेव्हा राजाने त्या ज्ञानवंतापुढे आपली समस्या ठेवून योग्य तो निर्णय सांगितले. तेव्हा तो ज्ञानवंत म्हणाला, 'राजन्, ही समस्या वाटते तेवढी कठीण नाही. क्षत्रिय कन्या विणकराला कशी देता येईल? वैश्यानं प्राप्त करून घेतलेल्या पशुपक्ष्यांच्या भाषाज्ञानाचा व्यावहारिक उपयोग काय? स्वधर्म व स्वकर्म यांच्यापासून दूर झालेल्या म्हणून पतित असा ब्राह्मणाच्या हातात राजकन्येचा हात कसा देता येईल? तेव्हा आता उरलेल्या चौथ्या खड्‌गधरालाच

राजकन्या द्यावी. कारण तो क्षत्रिय पराक्रमी महावीर आहे. म्हणूनच तो अनुरूप वर आहे !' असा त्या ज्ञानवंताचा निर्णय राजा वीरदेव व अनंगरती यांना पसंत पडला.

त्याप्रमाणे राजाने एका शुभमुहूर्तावर अनंगरती व खड्गधर यांचा शुभविवाह मोठ्या थाटाने साजरा केला.

# एकेकाची दैवगती

कोणे एके काळी कांचनपुरी नावाचे एक नगर होते. त्या नगराच्या थोर राजाचे नाव हाते सुमना. त्याने बराच मोठा प्रदेश जिंकून आपल्या स्वामित्वाखाली आणला होता. शौर्याबरोबर विद्वत्ता व नाना कलाभिज्ञताही त्याच्या ठायी होती. असा तो प्रजाहितदक्ष राजा एके दिवशी राजसभेत बसला असता एक द्वारपाल तिथे आला आणि राजाला वंदन करून म्हणाला, 'महाराज, मुक्तलता नावाची एक व्याधकन्या पिंजऱ्यातल्या पोपटाला घेऊन राजद्वारी उभी आहे. तिच्याबरोबर वीरप्रभ नावाचा तिचा भाऊ आहे. त्यांची आपणास भेटण्याची इच्छा आहे. आपली आज्ञा व्हावी!' असे द्वारपालाचे शब्द ऐकून राजाने त्याला आज्ञा केली, 'जा. त्यांना राजसभेत घेऊन ये!'

थोड्या वेळाने हातात पोपटाचा पिंजरा धारण केलेल्या व्याधकन्येस घेऊन द्वारपाल राजसभेत आला. त्या व्याधकन्येला पाहताच राजसभेतील समस्त सभासदांच्या मुखातून आश्चर्योद्गार बाहेर पडला, 'कोण? व्याधकन्या! आणि एवढी स्वरूपसुंदर? छे, खात्रीनं ही कुणी शापित दिव्य तरुणी असेल!' तेवढ्यात ती राजाला वंदन करून म्हणाली, 'महाराज, या पिंजऱ्यातला शास्त्रगंज नावाचा पोपट उत्तम कवी असून सर्व विद्या व कलात प्रवीण आहे. एवढंच नव्हे तर त्यानं चारही वेदांचा अभ्यास केला आहे. तो आपणाजवळचं असणं योग्य म्हणून त्याला इथं घेऊन आले आहे. कृपा करून आपण त्याचा स्वीकार करावा ही विनंती!' 'ठीक आहे', असे म्हणून राजाने त्या पोपटाचा स्वीकार केला.

तेव्हा पोपट राजाला म्हणाला, 'राजन्, मी कोणत्या वेदातील कोणती ऋचा म्हणू किंवा कोणत्या शास्त्रातला कोणता सिद्धांत सांगू त्याची मला आज्ञा कर!' असे त्या अद्भुत पोपटाचे नवलपूर्ण शब्द ऐकताच राजा आश्चर्याने

थक्क होऊन त्याच्याकडे एकटक बघतच राहिला. तेव्हा त्याचा मंत्री म्हणाला, 'महाराज, हा पोपट म्हणजे पूर्वजन्मीचा कुणी तपोनिष्ठ मुनी असावा. शापामुळं त्याला पोपटाचा जन्म प्राप्त झाला असावा.म्हणून मागील जन्माच्या ज्ञानाचं त्याला स्मरण आहे.'

तेव्हा राजाने पोपटाला विचारले, 'शुकराज, मला खरोखरच तुझ्याबद्दल फार आश्चर्य व कुतूहल वाटत आहे. तू कोण ? कुठं जन्मलास ? पोपट असून तू एवढा ज्ञानी कसा ? हे सर्व कळावं म्हणून तुझी हकीकत ऐकण्याची माझी इच्छा आहे.' तेव्हा डोळ्यात पाणी आणून पोपट म्हणाला, 'महाराज, माझ्याबद्दल सांगण्यासारखं तसं विशेष काही नाही. पण आपली आज्ञा म्हणून जे आहे ते कथन करतो, ऐका.' असे म्हणून पोपट आपली हकीकत सांगू लागला. तो म्हणाला,

''पर्वतराज हिमालयाच्या पायथ्याशी अरण्यात एक भला मोठा वटवृक्ष आहे. त्याच्या अनेक फांद्यांवर अनेक पक्षी निवास करतात. एका फांदीवर माझे आई वडील घर करून राहात होते. मी जन्मताच माझी आई दिवंगत झाली. तेव्हा माझे वृद्ध वडील माझा जिवापाड सांभाळ करू लागले. एकदा भिल्लांची एक मोठी टोळी त्या अरण्यात शिकारीकरिता आली. तेव्हा जिवाच्या भयाने त्या अरण्यातले प्राणी वाट फुटेल तिकडे धावू लागले. तेव्हा त्या दुष्ट भिल्लांनी पुष्कळ प्राण्यांना मारले. संध्याकाळी मिळालेली सर्व शिकार घेऊन ते आपल्या वस्तीकडं निघाले. त्यांच्यापैकी एका म्हाताऱ्या भिल्लाला एकही शिकार मिळाली नाही. त्यामुळं वैतागून तो निराश झला होता.

तेवढ्यात त्याची नजर पक्ष्यांच्या किलबिलाटानं भरलेल्या वटवृक्षाकडं गेली. तेव्हा मोठ्या आसुरी आनंदानं तो दुष्ट सरसर झाडावर चढला आणि त्याच्या फांद्याफांद्यावरील पोपट आणि इतर पक्ष्यांच्या घरट्यांचा विध्वंस करून हाती सापडतील त्या पक्ष्यांना मारून खाली जमिनीवर फेकून देऊ लागला. तेव्हा अत्यंत भयभीत होऊन मी पित्याच्या पंखात लपून राहिलो. त्या दुष्ट भिल्लानं माझ्या पित्यालाही मारून खाली भूमीवर फेकून दिले. तेव्हा त्याच्याबरोबर मीही खाली पडलो. पण मला काही इजा झाली नाही. खाली

पडताच जीव वाचविण्यासाठी मी हळूहळू सरकत गवत व पाने यांच्याआड दडून राहिलो.

थोड्या वेळाने तो भयंकर भिल्ल झाडावरून खाली उतरला. मारून झाडाखाली इकडेतिकडे फेकलेले सारे पक्षी त्यानं गोळा केले आणि तो तेथून चालता झाला. तेव्हा माझ्या जिवात जीव आला. ती रात्र मी मोठ्या काळजीत घालविली. तहानेनं फार व्याकुळ झाल्यामुळं सकाळ होताच मी पाणी पिण्याकरिता अडखळत धडपडत जवळच असलेल्या पद्म सरोवराच्या काठी गेलो. माझी पूर्वपुण्याई म्हणूनच की काय तेथे स्नानार्थ आलेल्या मरिची नावाच्या मुनीनं मला पाहिलं. तेव्हा असहाय अशा माझी करुणा येऊन त्यानं मला हळुवारपणे आपल्या हाती उचलून घेतलं. मला पाणी पाजलं आणि नंतर पानाच्या द्रोणात घालून आपल्या आश्रमाकडं नेलं. त्यावेळी तिथं असलेले कुलपती पुलस्त्य मुनींच्या मुद्रेवर करुणामय हास्य उमटले. ते पाहून त्यांच्यापाशी असलेल्या मुनींनी हसण्याचं कारण सांगण्याची त्यांना विनंती केली. तेव्हा ते म्हणाले, 'शापाच्या प्रभावानं पोपट झालेल्या या महात्म्यास पाहून विषाद वाटून मला हसू आलं.' असे कुलपतीचे शब्द ऐकून मुनींनी माझं पूर्ववृत्त सांगावं म्हणून त्यांची प्रार्थना केली. तेव्हा दिव्य दृष्टीचे पुलस्त्य म्हणाले, 'आता ऐका या पोपटाची पूर्वकथा. ती ऐकून यालासुद्धा आपल्या गेल्या जन्माची आठवण होईल.' असे म्हणून ते माझं पूर्ववृत्त सांगू लागले.

'पूर्वी रत्नाकर नामक नगरात ज्योतिष्प्रभ नावाचा एक राजा होता. तो पृथ्वीपती होता. शंकराच्या अनन्यभक्तीनं त्याला हर्षवती राणीच्या ठायी एक पुत्र झाला. त्याचं नाव सोमप्रभ असं होतं. तो देखणा व सद्‌गुणी होता. यथावकाश तो मोठा व राज्यकारभार पाहण्यास योग्य झाल्यावर ज्योतिष्प्रभ राजाने त्याला युवराजपद दिले व आपल्या मंत्र्याच्या सद्‌गुणी मुलाला त्याचा मंत्री केले. त्याचवेळी आकाशातून इंद्राचा सारथी मातली एका दिव्य अश्वासह खाली उतरला. आणि सोमप्रभाकडे येऊन म्हणाला, 'देवेंद्राचा मित्र विद्याधर म्हणून तू भूलोकावर जन्म घेतला आहेस. म्हणून देवेंद्रानं मित्रभेट म्हणून हा आयुश्रवा नावाचा दिव्य अश्व तुला दिला आहे. याच्या योगानं तू अजिंक्य

होशील !' असे सांगून मातलीने तो दिव्य अश्व सोमप्रभाला दिला. आणि तो निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सोमप्रभानं दिग्विजयात जाण्याची आपली इच्छा पित्याला सांगून आज्ञा मिळविली. नंतर प्रवासाची यथायोग्य सर्व तयारी झाल्यावर एके दिवशी शुभ मुहुर्तावर सोमप्रभ आपल्या मातापित्यांना वंदन करून आयुश्रवा अश्वावर आरूढ झाला आणि दिग्विजयासाठी ससैन्य नगराबाहेर पडला. यथावकाश आपल्या अतुल शौर्याने व दिव्य अश्वाच्या प्रभावाने सोमप्रभाने सर्व दिशातील राजांना जिंकून घेतले. अशा रीतीने दिग्विजय प्राप्त करून घेण्याचे कार्य पूर्ण झाल्यावर, आपल्या नगराकडे परत येत असताना सोमप्रभाने हिमालयाजवळच्या प्रदेशात तळ देण्याची आपल्या सैन्यास आज्ञा केली. आणि तो स्वतः शिकारीकरिता जवळपासच्या अरण्यात शिरला. तेव्हा त्याला रत्नाभरणांनी युक्त असा एक किन्नर दिसला. त्याला पकडण्यासाठी सोमप्रभ अश्वावरून पुढे धावला पण तो किन्नरं एका गुहेत गुप्त झाला. आणि तेवढ्या अवधीत त्या दिव्य घोड्याने सोमप्रभाला खूपच दूर नले.

सूर्यास्ताची वेळ झाली तेव्हा थकलेला सोमप्रभ आपल्या तळाकडे परत निघाला. वाटेत त्याला एक रम्य सरोवर आढळले. त्याच्या काठी रात्र काढावी असा विचार करून तो अश्वावरून खाली उतरला. त्याने अश्वाला जवळच्या एका झाडाला बांधून त्याला खाण्यास गवत व पिण्यास पाणी दिले. नंतर सांयसंध्यादि करून त्याने आपल्याकरिता फळे, कंदमुळे व पाणी आणले आणि एका झाडाखाली विश्रांती घेण्यासाठी तो बसला. त्यावेळी एका मंजुळ गीताचा आवाज त्याच्या कानी येऊं लागला. तेव्हा एवढे मंजुळ गीत कोण गात आहे ते पाहण्यासाठी सोमप्रभ आवाजाच्या दिशेने निघाला. काही अंतरावर त्याला एक दिव्य कन्या गायनात दंग झालेली आढळली. तेव्हा ही कोण लावण्यवती असावी असा प्रश्न त्याच्या मनात आला. तेवढ्यात त्या लावण्यवतीची नजर सोमप्रभाकडे गेली. मग तिने चटकन् उठून त्याचे आतिथ्य केले. आणि विचारले, 'आपण कोण ? या दुर्गम स्थळी एकटेच कसे आलात ?'

असे त्या लावण्यवतीचे शब्द ऐकून सोमप्रभाने आपल्या संबधीची सर्व हकीकत तिला सांगितली आणि तिला विचारले,'तू कोण ?या निर्जन व

भयंकर अरण्यात एकटीच कशी?' तेव्हा ती खिन्नपणे म्हणाली,'आपण आपुलकीनं विचारत आहात म्हणून मी आपली हकीकत सांगते. ऐका.' असे म्हणून काही क्षण स्तब्ध राहून तिने आपले पाणावलेले डोळे पुसले आणि ती म्हणाली, 'हिमालयावरील कांचनाभ नगराचा विद्याधर राजा पद्मकूट हा माझा पिता. त्याची राणी हेमप्रभा ही माझी माता. माझं नाव मनोरथप्रभा. मातापित्यांची फार लाडकी, अशी मी आपल्या मैत्रिणीसह दररोज तीन प्रहर वने, उद्याने, पर्वत, द्वीपे इत्यादि स्थळी भ्रमण करून वडिलांच्या जेवणाचे वेळी घरी येत असे. अशीच एके दिवशी भ्रमण करीत मी या सरोवरापाशी आले. त्यावेळी दीधितिमान मुनींचा मानसपुत्र रश्मिमान आपल्या मित्रासह इथे आला होता.'

त्या देखण्या मुनिपुत्राला पाहताच माझे मन त्याच्याकडे आकर्षित झाले. आणि त्याची माझ्याकडे दृष्टी जाताच त्याचीही माझ्यासारखीच अवस्था झाली. तेव्हा माझ्या सखीने मुनिपुत्राच्या मित्राकडून त्याची सर्व माहिती विचारून घेतली. नंतर मित्राने विचारल्यावरून तिने माझ्याबद्दलची सर्व हकीकत त्याला सांगितली. तेव्हा आम्ही दोघे सर्वतोपरी एकमेकांस अनुरूप आहोत असे आढळल्यावर आमचा प्रेमभाव वृद्धिंगत होऊ लागला. तेवढ्यात माझ्या पित्याच्या भोजनाची वेळ झाली असा निरोप आल्याने मी रश्मिमानास इथेच थांबण्यास सांगून घराकडे परतले. भोजन करून बाहेर येताच रश्मिमानाचा मित्र घराच्या अंगणात आला आहे असे सखीने मला सांगितले. तेव्हा त्याच्याकडे जाऊन मी त्याला तिथे येण्याचे कारण विचारले, तेव्हा तो म्हणाला, 'देवी, माझा सखा रश्मिमान तुझ्या वियोगामुळं अत्यंत व्याकुळ होऊन प्राणधारणा करण्यासही असमर्थ झाला आहे. तेव्हा तू लवकर माझ्याबरोबर तिकडे चल!' ते ऐकून मी माझ्या सखीसह मोठ्या त्वरेने त्याच्याबरोबर निघाले. आणि इथे येऊन बघते तो माझ्या वियोगाने चंद्रोदय होताच रश्मिमानाने प्राणत्याग केला असल्याचे मला आढळले.

तेव्हा मी अत्यंत दुःखी होऊन रश्मिमानाच्या देहासह अग्निप्रवेश करण्याचा विचार केला. तेवढ्यात एक अत्यंत तेजस्वी पुरुष आकाशातून खाली उतरला आणि रश्मिमानाचा देह उचलून घेऊन तो पुन्हा आकाशात

दिसेनासा झाला. आता आपण एकट्यानेच अग्निप्रवेश करावा असे मी ठरविले. त्यावेळी, 'मनोरथप्रभे, अशी भलती गोष्ट करू नकोस. कालांतराने तुला रश्मिमान पुन्हा भेटेल!' अशी आकाशवाणी झाली. म्हणून प्राणत्याग न करता रश्मिमानाच्या पुनर्भेटीच्या योग्य काळाची वाट बघत शंकराची उपासना करीत मी इथं राहिले आहे. तेव्हा पासून रश्मिमानाचा मित्र मला पुन्हा दिसला नाही.

अशी मनोरथेप्रभेची करुण कहाणी ऐकून सोमप्रभाने तिला विचारले, 'आता तू इथं एकटीच कशी ? तुझी सखी कुठं गेली ?' 'सिंहविक्रम नावाच्या विद्याधर राजाची मुलगी मकरंदिका माझी जिवलग मैत्रीण आहे. ती अविवाहित असून माझ्या दुःखानं दुःखी झाली आहे.' मनोरथप्रभा म्हणाली, 'तिनं माझं कुशल कळून घेण्यासाठी आपली सखी पाठविली होती. तिच्याबरोबर माझी सखी गेली आहे. ती आता इथं येईलच.'

मनोरथप्रभा असे सांगत आहे तोच तिची सखी तिथे आली. तिच्या पाठोपाठ देवजय नावाचा एक विद्याधरही आकाशातून खाली उतरून तिथें आला. आणि वंदन करून मनोरथप्रभेला म्हणाला, 'मी सिंहविक्रम राजाकडून आलो आहे. तुझं लग्न झाल्याशिवाय मला लग्न करायचं नाही असं मकरंदिका म्हणते. तेव्हा तू तिला उपदेशाचे चार शब्द सांग म्हणजे ती लग्नाला तयार होईल.' देवजयाने सांगितलेल्या अशा निरोपाप्रमाणे मनोरथप्रभा मकरंदिकेकडे जाण्यास निघाली. तेव्हा सोमप्रभ तिला म्हणाला, 'हे कल्याणी, विद्याधर लोक बघावा अशी माझी इच्छा आहे. तेव्हा कृपा करून मला तेथे ने अशी तुला माझी विनंती आहे.'

सोमप्रभाची विनंती मनोरथप्रभेने मान्य केली. त्याला देवजयाच्या मांडीवर बसवून ती आपल्या सखीसह आकाशमार्गाने यथावकाश सिंहविक्रम राजाच्या नगरास पोहोचली. तेव्हा मकरंदिकेने सर्वांचे चांगले आतिथ्य केले. नंतर तिने मनोरथप्रभेला एकांतात विचारले, 'सखे, तुझ्याबरोबर आलेला तो महाभाग कोण आहे ?' तेव्हा सोमप्रभाच्या दर्शनाने मकरंदिका प्रभावित झाली आहे असे जाणून मनोरथप्रभेने सोमप्रभाबद्दलची सर्व हकीकत तिला सांगितली आणि विचारले, 'आपण लग्न करावं असं तुला का वाटत नाही ?' तेव्हा

मकरंदिका म्हणाली, 'तू माझी जीवश्च कंठश्च मैत्रीण. तू अविवाहित असता मी कशी विवाहित होऊ?' 'अग वेडे, माझा वर निश्चित झाला आहे.' मनोरथप्रभा म्हणाली, 'फक्त त्याच्या भेटीच्या वेळेचीच मी वाट बघत आहे.' 'तसंच असेल तर मग तुझा विचार काय आहे तो मला सांग', मकरंदिका म्हणाली, 'त्याप्रमाणं मी वागेन.'

सोमप्रभ व मकरंदिका हे दोघेही परस्परावर अनुरूप झाले आहेत हे चाणाक्ष मनोरथप्रभेने ओळखले होते. म्हणून ती मकरंदिकेला म्हणाली, 'गडे मकरंदिके, दिग्विजय होऊन सोमप्रभ दैववशात् तुझ्या घरी अतिथी म्हणून आला आहे. त्याचा तू सत्कार करावास असं मला वाटतं.' असे मनोरथप्रभेचे शब्द ऐकून लाजेने आरक्त झालेली मकरंदिका खालच्या मानेने म्हणाली, 'सखे, तुझ्या मनातील भाव ओळखून मी सांगते, त्याला तनमन अर्पून मी त्याचा सत्कार करीन!' अशी मकरंदिकेची सोमप्रभाला वरण्याची इच्छा तिच्याच तोंडून प्रगट झाल्यावर आनंदित झालेल्या मनोरथप्रभेने ती गोष्ट मकरंदिकेच्या मात्यापित्यांना सांगितली. तेव्हा त्यांना फार आनंद झाला. विवाहाच्या सिद्धतेसंबंधी मनोरथप्रभा बोलताच आनंदित झालेला सोमप्रभ तिला म्हणाला, 'हे कल्याणी, प्रथम मला आता तुझ्या आश्रमाकडं गेलं पाहिजे. तिथं माझा शोध घेत माझा मंत्री ससैन्य आला असेल. तिथे फक्त माझा घोडा पाहून त्याला माझ्या जीविताविषयी शंका येईल आणि तो परत जाईल. तसं होऊ नये म्हणून आपण आताच तिकडे जाऊ, नंतर एका शुभमुहूर्तावर मी मकरंदिकेशी विवाहबद्ध होईन.'

असे सोमप्रभाचे बोलणे मनोरथप्रभेला योग्य वाटून तिने सोमप्रभाला देवजयाच्या साह्याने पुन्हा आपल्या आश्रमाकडे नेले. तेथे सोमप्रभाचा मंत्री ससैन्य आला होताच. त्याला भेटून सोमप्रभाने सर्व घडलेली हकीकत सांगितली. तेवढ्यात सोमप्रभाच्या वडिलांचा एक खास दूत 'सत्वर परत यावे' असा निरोप घेऊन तिथे आला. तेव्हा 'वडिलांस भेटून लवकर परत येतो' असे सोमप्रभाने मनोरथप्रभा व दैवजय यांना सांगितले आणि तो आपल्या लवाजम्यासह नगराकडे परत गेला.

नंतर देवजय मकरंदिकेकडे गेला आणि त्याने ते वृत्त तिला सांगितले. तेव्हा आता सोमप्रभाचा दीर्घ विरह होणार म्हणून मकरंदिका फार दुःखी झाली. जसे दिवस जाऊ लागले तशी ती फार कष्टी होऊ लागली. तिने आहारविहारही सोडून दिला. तिच्या मात्यापित्यांनी तिला पुष्कळ उपदेश केला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. ती सदासर्वकाळ अस्वस्थ मनाने राहू व वागू लागली. आपले सर्वतोपरी सांगणे व समजूत घालणे निष्फळ झालेले पाहून तिच्या मातापित्यांना फार राग आला आणि त्यांनी तिला, 'या जन्माचं स्मरण न राहता तू काही काळ दरिद्री भिल्लांच्या संगतीत वास्तव्य करशील' असा शाप दिला.

त्या शापामुळे मकरंदिका भिल्लांच्या वस्तीत भिल्ल कन्या झाली. कन्येला शापिले म्हणून दुःख व पश्चात्ताप होऊन सिंहविक्रम व त्याची भार्या मृत्यू पावली. सिंहविक्रम प्रथम वेदशास्त्रप्रवीण असा मुनी झाला. नंतर शिल्लक राहिलेल्या पापाच्या दोषामुळे तो पोपट झाला. पूर्वी केलेले वेदशास्त्राध्ययन तपाच्या प्रभावाने त्याच्या स्मरणात आहे. या पोपटाची अशी विलक्षण प्रारब्ध लीला पाहून मला विषादाने हसू आले. पुढे हा पोपट राजसभेत आपली कथा सांगून शापमुक्त होईल. सोमप्रभाला भिल्लकन्या झालेली मकरंदिका लाभेल आणि त्याचवेळी, आता राजा झालेल्या रश्मिमानाला मनोरथप्रभा भेटेल. वडिलांची भेट घेऊन सोमप्रभ पुन्हा मनोरथप्रभेच्या आश्रमात जाऊन शंकराच्या उपासनेत मग्न झाला आहे.'

एवढे बोलून पुलस्त्य मुनी स्तब्ध झाले. त्यांचे बोलणे संपताच मला मागील जन्माची आठवण झाली. त्याबरोबर माझे हृदय आनंद दुःखादि भावनांनी भरून गेले. पुढे मरीची मुनीने माझा प्रेमळपणे सांभाळ करून मला लहानाचा मोठा केले. नंतर एके दिवशी इकडे तिकडे भटकत असता मी भिल्लांच्या हाती सापडून, हे राजा, तुझ्या जवळ आलो आहे.'' अशी आपली कथा राजसभेत सांगून तो अद्‌भुत पोपट स्तब्ध बसला. त्यावेळी अत्यांनदाने सुमन राजाला देहभानाची विस्मृती झाली.

तिकडे प्रखर उपासनेने प्रसन्न झालेल्या शंकराने सोमप्रभाच्या स्वप्नात येऊन त्याला आज्ञा केली, 'राजन्, तुझ्या उपासनेने मी संतुष्ट झालो आहे. आता तू सत्वर सुमन राजाकडे जा. तिथ तुझी नियोजित भार्या तुला प्राप्त होईल.

मातापित्याच्या शापामुळे सांप्रत ती मुक्तलता नावाची भिल्ल कन्या झाली आहे. आणि या समयी ती पोपट झालेल्या आपल्या पित्याला घेऊन त्या राजाकडे गेली आहे. तुला पाहताच ती शापमुक्त होईल.' नंतर देवाधिदेव शंकराने मनोरथप्रभेच्याही स्वप्नात येऊन तिला आदेश दिला, 'तुझा इच्छित वर रश्मिमान सांप्रत सुमन राजा झाला आहे. तू त्याच्याकडे जाऊन त्याची प्राप्ती करून घे. तुझ्या दर्शनानं त्याची पूर्वजन्माची स्मृती जागृत होईल!'

अशा भगवान शंकराच्या आदेशाप्रमाणे सोमप्रभ व मनोरथप्रभा सुमन राजाच्या राजसभेत उपस्थित झाली. तिथे सोमप्रभाला पाहताच मकरंदिकेला पूर्वजन्माची आठवण झाली. शापमुक्त झालेली ती दिव्य देह धारण करून मोठ्या आनंदाने सोमप्रभाला भेटली. मनोरथप्रभेच्या दर्शनाने सुमन राजाचीही गत जन्माची स्मृती जागृत झाली. त्याच वेळी आकाशातून खाली उतरलेल्या आपल्या पूर्वशरीरात प्रवेश करून तो रश्मिमान झाला आणि आपल्या कांतेला भेटला.

नंतर सोमप्रभ मकरंदिकेसह स्वनगरास गेला. रश्मिमान मनोरथप्रभेसह आपल्या आश्रमाकडे निघून गेला. आणि पोपटाने पक्षीदेहाचा त्याग करून तपोबलाने प्राप्त केलेल्या आपल्या स्थानाकडे गमन केले.

❦ ❦

31/3/98

# परोपकारी जीमूतवाहन

ही आहे परोपकारी जीमूतवाहनाची कथा. खूप वर्षापूर्वी हिमवान नावाच्या उत्तुंग व पवित्र पर्वतावर कांचनपूर नावाचे एक सुखसंपन्न नगर होते. जीमूतकेतू नावाचा श्रीमंत विद्याधर त्या नगराचा राजा होता. त्याच्या प्रासादाभोवतालच्या उद्यानात एक कल्पवृक्ष होता. तो जीमूतकेतूला वंशपरंपरागत लाभला होता. त्या कल्पवृक्षाचे नाव 'मनोरथदायक' असे होते. त्याची प्रार्थना करणाऱ्याचे मनोरथ पूर्ण होत असत. अशा त्या वृक्षाची अनन्यभावे उपासना केल्यानंतर जीमूतकेतूला मुलगा झाला. त्याने त्याचे नाव जीमूतवाहन असे ठेवले. बोधिसत्त्वाच्या अंशापासून त्याचा जन्म झालेला असल्याने त्याला आपल्या पूर्वजन्माचे स्मरण होते. योग्य वयात विद्याभ्यास करून तो वाढत गुरुसेवाभावी, उदार, धैर्यशाली आणि सर्व प्राण्यांवर दया करणारा तरुण झाला. तेव्हा सद्गुणी अशा त्याला मंत्र्यांच्या सल्ल्याने जीमूतकेतूने युवराजपद दिले.

एकदा काही राजमंत्री जीमूतवाहनाला म्हणाले, 'महाराज, आपणास सदैव पूज्य असलेला आपल्या बागेतला कल्पतरु म्हणजे आपल्या महान पूर्वजांनी जतन करून ठेवलेला नित्य मनकामना पूर्ण करणारा दुष्प्राप्य असा मंगल ठेवाच आहे. त्याची कृपा असल्यावर देवेंद्रसुद्धा आपणास त्रास देणार नाही !' असे आपल्या मंत्र्यांचे शब्द ऐकून जीमूतवाहन स्वतःशी म्हणाला, 'अरे रे' एवढा दिव्य वृक्ष दारी असूनसुद्धा आमच्या पूर्वजांपैकी एकानेही त्याच्यापासून सदैव कल्याणकारक अशी फलप्राप्ती मुळीच करून घेतली नाही. कृपण वृत्तीप्रमाणे स्वार्थासाठी त्यांनी फक्त काही वस्तूंचीच दिव्य वृक्षापाशी मागणी केली. त्यामुळे त्यांनी स्वतः बरोबर त्यालाही निष्कारण कमीपणा आणला. म्हणून आता मी त्याच्याकडून माझी चिरवांछित इच्छा पूर्ण करून घेतो.'

असा मनाशी निश्चय करून जीमूतवाहन आपल्या वडिलांकडे गेला. त्याने त्यांची सेवा करून त्यांना प्रसन्न करून घेतले. नंतर जीमूतवाहन नम्रपणे त्यांना म्हणाला, 'बाबा, स्पष्टपणे बोलतो. क्षमा करा. संसारातील, देहासह सर्वच वस्तुजात नाशवंत आहे. संध्या, विद्युत्‌ व लक्ष्मी कधीतरी कुठं स्थिर राहिली आहे. आणि ती म्हणजे परोपकार ! तो युगानयुगांचा साक्षी, व धर्म आणि यश यांचा निर्माता आहे. तेव्हा नश्वर सुखोपभोगाच्या लाभाकरिता दारी असलेला दिव्य कल्पवृक्ष आम्ही वंशपरंपरागत का जतन करून ठेवीत आहोत ? ज्या आपल्या पूर्वजांनी 'हा माझा' म्हणून ज्याचं जिवापाड जतन केलं तो इथंच आहे आणि ते कुठं गेले ? त्यांचा व या वृक्षाचा आता काहीतरी संबंध राहिला आहे का ? काही दिवसांनी आपलीही अवस्था तशीच होणार आहे. म्हणून बाबा, परोपकार याच एका फलप्राप्तीकरिता मी आपल्या बागेतील कल्पवृक्षाचा उपयोग करतो. अशी आपली आज्ञा असावी !'

असे जीमूतवाहनाचे बोल ऐकून त्याचे विरागी वडील त्याला म्हणाले, 'पुत्रा, जा, तुझ्या इच्छेप्रमाणं तू या कल्पवृक्षाचा उपयोग कर !' अशी वडिलांची आज्ञा मिळताच जीमूतवाहन थेट कल्पवृक्षाकडे गेला. त्याच्यापुढे हात जोडून उभा राहून तो म्हणाला, 'हे देवा, तू आजपर्यंत आमच्या पूर्वजांच्या योग्य त्या सर्व इच्छा पूर्ण केल्यास. आता तू माझी फक्त एकच इच्छा पूर्ण कर. या सर्व पृथ्वीवर एकही माणूस दरिद्री राहणार नाही, अशी तू व्यवस्था कर. तुझं भलं होवो. आता तू जा. मी तुला द्रव्यप्राप्तीची इच्छा करणाऱ्या लोकांना देऊन टाकलं आहे !' एवढे बोलून जीमूतवाहनाने त्या कल्पवृक्षाला वंदन केले. तेव्हा त्या वृक्षातून वाणी प्रगट झाली, 'ठीक आहे, तू मला जाण्याची आज्ञा केली आहेस तेव्हा आता मला जाणं आवश्यक आहे.' नंतर तो वृक्ष लगेच आकाशात गेला आणि त्याने एवढी धनवृष्टी केली की पृथ्वीवर एकही माणूस दरिद्री राहिला नाही.

जीमूतवाहनाची अशी परोपकारी कीर्ती त्रिभुवनात पसरली. पण त्याच्या कुळातील लोकांना त्याची कृती आवडली नाही. ते मत्सरग्रस्त झाले. त्यांनी विचार केला, 'वेळप्रसंगी दैवी मदत करून दुःख हरण करणारा दिव्य कल्पवृक्ष जीमूतवाहनाने लोकांना देऊन टाकल्यामुळे आता आपणास त्याचा

त्याच्या पित्यासह पराभव करून त्याचे राज्य जिंकून घेता येईल.' अशा विचाराने त्यांनी युद्धाची तयारी केली. ते वृत्त जीमूतवाहनाला कळताच तो आपल्या वडिलांना म्हणाला, 'बाबा, तुम्ही हाती शस्त्र धरलं तर तुमच्या राज्यहरणार्थ तुमच्यासमोर येण्यास कोण समर्थ आहे ? राज्य हे या नाशवंत शरीराच्या सुखोपभोगासाठीच आहे. असे हे राज्य स्वबांधवांचा नाश करून राखण्यात काय अर्थ आहे ? त्यापेक्षा राजत्याग करून आपण अंती सुखप्रद व कल्याणदायक होणारं धर्माचरण करण्यास इतरत्र निघून जाऊ. राज्याची हाव असलेले बांधव आपल्या राज्याच्या प्राप्तीनं सुख पावोत!' असे जीमूतवाहनाचे औदार्यपूर्ण शब्द ऐकून त्याचे वडील जीमूतकेतु त्याला म्हणाले, 'पुत्रा, तुझ्यासाठीच हे राज्य राखून ठेवायचं आहे. पण कृपादृष्टीनं तू जर त्याचा त्याग करत असशील तर मला वृद्धाला तरी त्याचा मोह कशाला ?' अशा प्रकारे राज्यत्यागाबद्दल वडिलांची व आईची आज्ञा घेतल्यावर जीमूतवाहनाने राजत्याग केला आणि आपल्या आईवडिलांसह तो मलयगिरीवर राहण्यास गेला. तेथे चंदन वृक्षांच्या गर्द छायेत असलेल्या एका निर्झराच्या काठी आश्रम बांधून तो मातापित्यांची सेवाशुश्रूषा करीत राहिला.

त्याच मलयगिरीवर विश्वावसु नावाचा एक सिद्धराजा राहात होता. त्याला मित्रावसु नावाचा मुलगा होता. त्याची व जीमूतवाहनाची मैत्री झाली. एकदा जीमूतवाहन एका मुनिपुत्राला घेऊन जवळच असलेल्या उद्यानातील मंदिरात गौरी देवीच्या दर्शनार्थ गेला. तेथे एक स्वरूपसुंदर युवती वीणावादन करून गात होती. तिच्या दिव्य गायनाने नादलुब्ध होऊन त्या उद्यानांत आलेली हरिणे तिच्याकडे एकटक बघत उभी होती. त्या युवतीने जीमूतवाहनाचे चित्त आकर्षित केले. तेवढ्यात त्या युवतीची दृष्टी विद्याधरपुत्र व देखण्या अशा जीमूतवाहनाकडे गेली. तेव्हा तिच्याही हृदयात त्याच्याबद्दल प्रेमभाव निर्माण झाला. जवळच त्या युवतीच्या सख्या होत्या. त्यापैकी एकीला जीमूतवाहनाने उत्सुकतेने विचारले, 'दिव्य गायन करणारी ही तुझी मैत्रीण कोण ? कुणाची मुलगी ?' तेव्हा ती म्हणाली, 'हिचं नाव आहे मलयवती. ती विश्वावसु सिद्धराजाची मुलगी व मित्रावसूची बहीण आहे.' एवढे सांगून तिने जीमूत वाहनाबरोबर आलेल्या मुनिपुत्राकडून जीमूतवाहनसंबंधीची सर्व माहिती

विचारली. नंतर ती मलयवतीकडे जाऊन तिला म्हणाली, 'सखे मलयवती, जगद्वंद्य विद्याधराधिप इथं आला आहे. त्याचं तू आदरातिथ्य नाही का करणार ?' तेव्हा लज्जेने नतमस्तक झालेली मलयवती स्तब्ध राहिली आहे असे पाहून त्या सखीने एक पुष्पमाला जीमूतवाहनास अर्पण केली. ती त्याने घेतली आणि नतमस्तक उभी राहिलेल्या मलयवतीच्या गळ्यात घातली. तेव्हा लज्जेने जास्तच आरक्त होऊन जीमूतवाहनाकडे प्रेमळ दृष्टीने बघत तिने आपल्या कंठातील ती पुष्पमाला काढली आणि त्याच्या गळ्यात घातली. अशा प्रकारे त्या दोघांनी एकमेकांशी एकही शब्द न बोलता एकमेकाला आपणहून वरले.

मलयवती उद्यानातून घराकडे निघून गेल्यानंतर मित्रावसूने जीमूतवाहनाची भेट घेतली. बोलण्याच्या ओघात त्याने आपली बहीण मलयवती हिचा स्वीकार करावा अशी जीमूतवाहनास विनंती केली तेव्हा जीमूतवाहन त्याला म्हणाला, 'मित्रा, थोड्या वेळापूर्वीच तिची व माझी भेट होऊन आम्ही एकमेकांस मनानं वरलं आहे. मला जन्मतःच पूर्वजन्माचं स्मरण आहे. गेल्या जन्मी मलयवती माझीच भार्या होती व तू देखील माझाच जिवलग मित्र होतास!' असे जीमूतवाहनाचे शब्द ऐकून मित्रावसू आश्चर्याने उद्गारला, 'अस्सं! तर मग गेल्या जन्मीची माझी हकीकत ऐकण्यास आता मी फार उत्सुक झालो आहे. तेव्हा कृपा करून ती तू मला सांग!' अशी मित्रावसूने केलेली विनंती जीमूतवाहनाने मान्य केली. आणि तो आपली पूर्वकथा सांगू लागला. तो म्हणाला,

"मागील जन्मातही मी विद्याधर कुलात जन्मलो होतो. एकदा हिमालयाच्या शिखरावरून मी भार्येसह आकाशगमन करीत असताना ज्या शिखरावर शंकर गौरीसह क्रीडा करीत होते त्या शिखराचे माझ्याकडून उल्लंघन झाले. तेव्हा संतापलेल्या शंकरानी आम्हाला शाप दिला, 'भूलोकी तुला मनुष्यजन्म प्राप्त होईल. त्या जन्मी हीच विद्याधरी तुझी भार्या होईल. आपल्या मुलावर संसाराची सर्व जबाबदारी टाकल्यावर तुला पूर्वजन्माचे स्मरण होऊन तू पुन्हा विद्याधर कुळात जन्म घेशील!' त्याप्रमाणं पुढे काही दिवसांनी मी पृथ्वीवर वलभी नावाच्या नगरातील एका धनाढ्य व्यापाऱ्याचा मुलगा झालो. त्यानं वसुदत्त असं माझं नाव ठेवलं. पुढं मी तरुण झाल्यावर पित्याने व्यापाराची

सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली.

एके दिवशी पित्याच्या आज्ञेप्रमाणं मी बराच माल घेऊन व्यापाराकरिता दुसऱ्या द्वीपास निघालो. वाटेतील अरण्यातून जात असताना भिल्लांच्या एका लुटारू टोळीनं माझ्यावर हल्ला केला. माझं सर्वस्व लुटून, मला बांधून त्यांनी भिल्लवस्तीत नेलं. तिथं एक चंडिकादेवीचं मंदिर होतं. त्या मंदिरात त्या भिल्लांचा नायक पुलिंदक देवीची पूजा करीत होता. तिथं देवीपुढं बळी देण्याकरिता मला नेण्यात आलं. पण पुलिंदकाची माझ्याकडं दृष्टी जाताच त्याला माझ्याबद्दल स्नेह वाटू लागला. अकारण स्नेह करणारं मन पूर्वजन्माचं प्रेम सुचवित असतं. त्या दयार्द्र पुलिंदकानं तत्काळ माझी बंधनातून मुक्तता केली. आणि आता स्वतःचाच देवीला बळी द्यावा असा त्यानं विचार केला. तेव्हा 'असं भलतं साहस करू नकोस. मी तुझ्यावर प्रसन्न झाले आहे. पाहिजे तो वर मागून घे!' अशी आकाशवाणी झाली. ती ऐकून पुलिंदक म्हणाला,'माते, तू प्रसन्न झालीस हाच मला परमानंद मिळाला आहे. आणखी जास्त काय मागू ? तथापि पुढल्या जन्मीही हा व्यापारी पुत्र माझा मित्र व्हावा अशी माझी इच्छा आहे.' तेव्हा 'तथास्तु' असं म्हणून आकाशवाणी स्तब्ध झाली. नंतर पुलिंदकाने माझ्या द्रव्यात आपल्या द्रव्याची भर घालून ते माझ्या स्वाधीन केले आणि आपला माणूस बरोबर देऊन मला सुखरूपपणे आपल्या घरी पोहोचविले. तेव्हा फक्त प्रवासातूनच नव्हे तर प्राणसंकटातून मी जिवंत परत आल्याबद्दल माझ्या पित्यानं मोठा आनंदोत्सव केला.

अरण्यातून प्रवास करताना चोरांकडून लूटमार होते अशी बऱ्याच लोकांची गाऱ्हाणी राजाकडे आली होती. तेव्हा लुटारूंचा बंदोबस्त करण्याकरिता राजाच्या आज्ञेने राजसैनिकांनी अरण्यातील भिल्ल वस्तीवर छापा घातला आणि बऱ्याच भिल्लांना पकडून आणलं. त्यात माझा प्राणदाता पुलिंदक होता. आता त्याला प्राणसंकटातून मुक्त करणं माझं कर्तव्यच होतं. त्याप्रमाणं राजाला एक लक्ष सुवर्णमुद्रिका देऊन मी पुलिंदकाला मुक्त करून मोठ्या स्नेहानं माझ्या घरी आणलं. आणि त्याचं चांगल्या प्रकारे आदरातिथ्य करीत त्या बरेच दिवस घरी ठेवून घेतलं. नंतर मित्रवियोग होणार म्हणून फार कष्टी झालेला पुलिंदक एके दिवशी आपल्या भिल्ल वस्तीकडे परत गेला.

पण मी केलेल्या उपकाराची फेड कशी करावी हाच विचार तो रात्रंदिवस मनात बाळगू लागाला. त्या वाटले, आपल्यापाशी असलेले द्रव्य, मोती, कस्तुरी, इत्यादि मूल्यवान वस्तू आपल्या जिवलग मित्रास भेट देण्यास योग्य नाहीत. त्यांच्यापेक्षा जास्त मौल्यवान अशीएखादी वस्तू त्याला अर्पण केली पाहिजे. त्या दृष्टीने विचार करता हत्तीच्या गंडस्थळातील मोती मिळवून त्याचा हार तयार करून द्यावा असे त्याने ठरविले. त्यासाठी हत्तीची शिकार करण्याकरिता तो हिमालयावरील दाट अरण्यात गेला. त्या अरण्यात हत्तीचा शोध घेत फिरत असता त्याने अथांग पाण्याने भरलेले एक सुंदर सरोवर पाहिले. त्याच्या कठी एक रम्य शिवमंदिर होते. त्या सरोवरातील स्वच्छ पाणी पिण्याकरिता हत्ती कदाचित तेथे येतील असे पुलिंदकास वाटून तो तेथेच एका झाडाखाली हत्ती येण्याची वाट बघत बसला.

तेवढ्यात त्या मंदिरातील शंकराची पूजा करण्याकरिता एक स्वरूपसुंदर कन्या सिंहावर बसून येत आहे असे पुलिंदकाला दिसले. तेव्हा आश्चर्याने थक्क होऊन तो स्वतःशी म्हणाला, 'सिंहावर बसून येणारी ही दिव्य कन्या मनुष्यजातीतली तर खासच नाही. कदाचित माझ्या पुण्याईमुळेच ही कोणी देवी माझ्या दृष्टीस पडली असावी. ही माझ्या जिवलग मित्राला मी प्राप्त करून देऊ शकलो तर माझ्यासारखा भाग्यवान मीच. प्रथम ती कोण, कुणाची वगैरे माहिती तर विचारून पाहू या!' असे म्हणून माझा मित्र पुलिंदक तिच्याकडे जाऊ लागला. तोपर्यंत ती लावण्यवती सिंहावरून उतरून पूजेसाठी सरोवरातील कमळे तोडीत होती. जवळ जाताच पुलिंदकाने तिला वंदन केले. तेव्हा हसतमुखाने तिचे स्वागत करून तिने विचारले, 'तू कोण ? अशा दुर्गम स्थळी का आलास ?'

असे तिचे प्रश्न ऐकून पुलिंदक म्हणाला, 'मी गौरी मातेचा एक सेवक आहे. माझं नाव पुलिंदक. हत्तीच्या गंडस्थळातील मोती मिळविण्याकरिता मी इथं आलोय्. आता तुला पाहताच मला माझ्या प्राणदात्या मित्राची आठवण झाली. तुझ्यासारखाच तो सुंदर आहे. त्याचं नाव वसुदत्त. स्नेह, दया, दान, धैर्य इत्यादि गुणांनी युक्त असा तो एका श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा आहे. तो तुला सर्वस्वी अनुरूप असाच वर आहे असं मला वाटतं!' हे ऐकून त्या सुंदरीने

विचारले, 'कुठं आहे तुझा तो मित्र ? त्याला तू इथं घेऊन येशील ? ' असे तिचे शब्द ऐकून अत्यंत आनंदित झालेला पुलिंदक म्हणाला, 'होय, अवश्य घेऊन येईन! पण त्याला काही दिवसांचा अवधी लागेल.' असे म्हणून पुलिंदकाने तिचा निरोप घेतला आणि तो आपल्या भिल्ल वस्तीकडे परतला.

नंतर तो मूल्यवान रत्ने व बरेच द्रव्य घेऊन एके दिवशी माझ्या घरी आला. त्याने ती सर्व संपत्ती माझ्या पित्याला अर्पण केली. आम्हीही त्याचे चांगले आदरातिथ्य करून त्या दिवशी त्याला आग्रहाने ठेवून घेतले. रात्री घरातील सर्वजण झोपल्यावर पुलिंदकाने सिंहवाहिनीची सर्व हकीकत मला सांगितली आणि तो म्हणाला, 'आताच आपण तिकडे जाण्यास निघू या. घरातून बाहेर पडण्यास ही वेळ चांगली आहे!' त्याप्रमाणे रात्रीच आम्ही प्रवासासाठी गुपचूपपणे घराबाहेर पडलो. पुलिंदकाच्या अद्‌भुत वृत्तांताने माझी उत्सुकता खूपच वाढविली होती. आम्हा दोघांवर माझ्या मातापित्यांचा विश्वास असल्यामुळे सकाळी आमची अनुपस्थिती त्यांच्या लक्षात येताच त्यांना भलते सलते काही वाटणार नाही अशी माझी खात्री होती.

झपाट्याने प्रवास करीत आम्ही यथावकाश त्या अरण्यातील सरोवरापाशी येऊन पोहोचलो. त्यावेळी संध्याकाळ होऊ लागली होती. तेव्हा फळेमुळे खाऊन व सरोवराचे स्वच्छ व गोड पाणी पिऊन आम्ही रात्रीचा मुक्काम एका झाडावरती केला. सकाळी नेहमीप्रमाणे शंकराच्या पूजेसाठी ती दिव्य कन्या सिंहावर बसून सरोवराच्या काठी असलेल्या मंदिराकडे येऊ लागली. तिला पाहताच भय, औत्सुक्य व विस्मय या भावनांनी मी पूर्णपणे भारावून गेलो. तिची पूजा झाल्यावर पुलिंदक तिच्यापाशी जाताच तिने त्याचे हसतमुखाने स्वागत केले. नंतर त्याने मी आल्याचे कळविताच मला घेऊन येण्यास तिने त्याला सांगितले. त्याप्रमाणे पुलिंदकानं मला तिच्याकडं नेलं. तेव्हा माझ्याकडे प्रेमार्द्र नजरेने बघत लज्जांकित होऊन ती पुलिंदकाला म्हणाली, 'हा तुझा मित्र खरंच मानव आहे का कुणी देव आहे ? मानव इतका का देखण्या रूपाचा असतो ?

असे तिचे शब्द ऐकून मी पुढं होऊन म्हटलं, 'सुंदरी, खरंच मी मनुष्य आहे. वलभी नगराच्या महाधन नावाच्या श्रीमंत व्यापाऱ्याला शंकराच्या कृपेने

झालेला पुत्र म्हणजे मी वसुदत्त. आणि मी व्यापाराकरिता दुसऱ्या द्वीपास जाताना माझ्यावर आलेल्या प्राणसंकटातून माझी मुक्तता करून माझ्याशी गाढ मैत्री करणारा हा माझा मित्र भिल्लराज पुलिंदक!' असे माझे बोलणं ऐकून ती सुंदरी म्हणाली, 'तुम्ही सांगितलं ते खरं आहे 'उद्या सकाळी तुला पति प्राप्ती होईल.' असा मला काल रात्री शंकरांनी दृष्टांत दिला होता. तोच तुमच्या रूपानं खरा झाला आहे. तेव्हा आता तुम्ही माझे नियोजित पती आणि भिल्लराज पुलिंदक माझा भाऊ!' असे तिचे शब्द ऐकून मला अत्यानंद झाला. नंतर पुलिंदकाने विवाहाकरिता माझ्या घराकडे जाण्यासंबंधी तिच्याशी बोलणे केले. तेव्हा त्या सुंदरीच्या विनंतीप्रमाणे मी तिच्यासह सिंहावर बसलो आणि पुलिंदकाच्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रवास करीत दोन दिवसांनी वलभी नगरास पोहोचलो. माझ्या आगमनाची वार्ता लोकांकडून माझ्या पित्याला कळताच तो हर्षित होऊन पुढे आला. तेव्हा मी व सुंदरीने सिंहावरून उतरून त्याला वंदन केले. नंतर घरी गेल्यावर पुलिंदकाने घडलेली सर्व हकीकत माझे आईवडील व इष्टमित्रांना सांगितली. तेव्हा सर्वांनी त्याच्या निस्सीम मित्रभावाची मुक्त कंठाने स्तुती केली. माझ्या सुखरूप आगमनाप्रीत्यर्थ वडिलांनी मोठा आनंदोत्सव साजरा केला.

नंतर एका शुभमुहूर्तावर मी सुंदरीशी विवाहबद्ध झालो. त्यावेळी एक आश्चर्याची गोष्ट घडून आली. सर्वादेखत सिंहाचा आकार नाहीसा होऊन त्याच्या जागी दिव्य वस्त्रालंकारांनी मंडित असा एक देखणा पुरुष दिसू लागला. तो मला म्हणाला, 'मी चित्रांगद नावाचा एक विद्याधर व ही माझी प्राणप्रिय कन्या मनोवती. हिला एकदा खांद्यावर घेऊन आकाशमार्गाने गंगा नदीवरून जात असता खाली गंगाजलात तपस्या करीत असलेल्या नारदमुनींच्या पाठीवर माझ्या गळ्यातील पुष्पमाला पडली. तेव्हा 'अरे पातक्या, तू एवढा उन्मत्त झाला आहेस तर सिंह होऊन तुझ्या मुलीला पाठीवर घेऊन हिमालयात भटकत रहा. जेव्हा कोणी एखादा महात्मा तुझ्या मुलीशी लग्न करील तेव्हा तुला पुन्हा विद्याधरत्व प्राप्त होईल, असा नारद मुनींनी मला शाप दिला. तेव्हा पासून मी हिमालयात शंकरपूजनात दक्ष असलेल्या मुलीचं रक्षण करीत राहिलो होतो. पण तुझा मित्र भिल्लराज याच्या प्रयत्नाने सर्वच कसं कल्याणदायक झालं!

त्याला तू साक्षी आहेसच. आता शापान्त झाल्यामुळं मी जातो. तुझं निरंतर कल्याण असो!' असे म्हणून चित्रांगद उडून गेला. त्याची अलौकिक हकीकत ऐकून सर्वांना मोठे आश्चर्य वाटले. दैवी संबध जुळून आल्यामुळे वडिलांना खूप आनंद वाटला. निर्व्याज मित्रांचे चरित्र अचिंत्य असते. ते प्राणदान करूनही मित्रावर उपकारच करतात व इतके करूनही ते तृप्त होत नाहीत.'

नंतर समस्त नागरिकांनी व राजानेसुद्धा पुलिंदकाची प्रशंसा व आमच्या गाढ मैत्रीची स्तुती केली. राजाने तर पुलिंदकाला सर्व अरण्याचा स्वामी केले. नंतर मनोवती पत्नी व भिल्लराज पुलिंदक यांच्या संगतीत मी सुखाने राहू लागलो. पुढे मला झालेल्या सुलक्षणी मुलाचे मी हिरण्यदत्त असे नाव ठेवले. तो मोठा झाल्यावर त्याचे लग्न केले. त्याचा सुखाचा संसार पाहून कृतकृत्य झालेल्या माझ्या मातापित्यांनी गंगातीरी जाऊन देहत्याग केला. तेव्हा अत्यंत दुःखी झालेल्या माझे, इष्टमित्रांनी सांत्वन केल्यामुळे मी पुन्हा संसाराच्या व्यापात गढून गेलो.

पुढे यथावकाश आम्हाला वृद्धावस्था प्राप्त झाली. तेव्हा संसाराची सर्व जबाबदारी हिरण्यदत्तावर सोपवून आम्ही कालिंजर पर्वतावर गेलो. आमच्या मागून पुलिंदकही तिथे आला. त्या पर्वतावर जाताच मला शंकराच्या शापाचे स्मरण झाले. माझे पूर्ववृत्त मला आठवले. ते मी मनोवती व पुलिंदक यांना सांगितले. नंतर पुढील जन्मातही त्यांची संगत लाभावी अशी उत्कट इच्छा मनात बाळगून शंकराचे स्मरण करीत मी मनोवती व पुलिंदक यांच्यासह पर्वतशिखरावरून देह विसर्जन केला, तोच मी आता जीमूतवाहन विद्याधर झालो आहे, तू म्हणजे भिल्लराज पुलिंदक व मलयवती म्हणजेच माझीच पत्नी मनोवती आहे. तेव्हा तिच्याशी विवाहबद्द होणे माझे कर्तव्यच आहे.''

अशी जीमूतवाहनाने सांगितलेली आपली अद्‌भुत पूर्वकथा ऐकून मित्रावसुला फार आनंद झाला. त्याने जीमूतकेतूला आपला मनोदय सांगून त्याची संमती घेतली. नंतर आपल्या आईवडिलांची आज्ञा घेऊन त्याने मलयवतीच्या विवाहाची सिद्धता केली. पुढे एका सुमुहूर्तावर जीमूतवाहनाने सिद्धांच्या व विद्याधरांच्या उपस्थितीत मलयवतीचे पाणिग्रहण केले. त्यांचा

लग्नोत्सव मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. जीमूतवाहन मलयवतीसह मोठ्या आनंदात मलयगिरीवर राहू लागला.

एके दिवशी तो मित्रावसूबरोबर समुद्रतीरावरील वनात फिरत असता त्याला एक दुःखी तरुण दिसला. तो आपल्याबरोबर शोक करीत येणाऱ्या एका प्रौढ स्त्रीला मागे जाण्यास सांगत होता. त्या तरुणाच्या सांगाती आलेल्या एका सेवकाने त्याला एका उंच व पसरट शिळेपाशी नेऊन सोडले. त्या दुःखी तरुणाला पाहून जीमूतवाहनाचे अंतःकरण द्रवले. पुढे जाऊन त्याला विचारले, 'कोण तू ? एवढा दुःखी का ? तुझी माता तुझ्यासाठी का अश्रु गाळीत आहे ?'

असे जीमूतवाहनाचे आपुलकीचे शब्द ऐकून तो तरुण म्हणाला, 'महाभाग, नाग, पक्षींद्र गरुडाशी कपटानं वागले म्हणून रागावलेल्या गरुडानं नागांचा संहार चालवला. तेव्हा नागलोक नाहीसा होईल या भीतीनं वासुकी नागराजानं गरुडाला विनंती केली, 'मी दररोज एक नाग तुझ्या आहारासाठी पाठवीत जाईन. तो समुद्रकिनाऱ्यावरील शिलेवर असेल. त्याचं तू भक्षण करून उदरनिर्वाह कर!' अशी वासुकीची विनंती गरुडानं मान्य केली. तेव्हापासून आज कित्येक दिवस वासुकीनं या शिलातलावर पाठविलेल्य नागाचं भक्षण करून गरुड आपली उपजीविका करीत आहे. आज गरुडाचं भक्ष्य बनण्याची माझ्यावर पाळी आली आहे. म्हणून वासुकीच्या सेवकानं या शंखचूडाला या शिळेपाशी आणून सोडलं आहे. आता माझा कायमचा वियोग होणार म्हणून ही माझी आई माझ्यासाठी शोक करीत आहे !'

असे त्या दुःखी शंखचूडाचे शब्द ऐकून दयाशील जीमूतवाहनाचे अंतःकरण द्रवले. तो शंखचूडाला म्हणाला, 'शंखचूडा, मी माझं शरीर गरुडाला अर्पण करून तुझी मुक्तता क तो. तू मुळीच दुःखी होऊ नकोस !' तेव्हा धीर धारण करून शंखचूड त्याला म्हणाला, 'महाभाग, असं भलतं कृपा करून बोलू नका. काचेकरिता मूल्यवान मोत्याचा मणी गमावणं हे केव्हाही योग्य नाही. शिवाय माझी दुष्कीर्ती मला मरणप्राय दुःख देईल.' अशा शब्दांनी शंखचूडाने जीमूतवाहनाच्या म्हणण्यास नकार दिला. नंतर गरुड येण्याची वेळ झाली आहे असे जाणून अखेरचे शिवदर्शन घ्यावे म्हणून तो समुद्रकिनाऱ्यावरील गोकर्ण नावाच्या शिवमंदिराकडे गेला.



तेव्हा शंखचूडाचा जीव वाचविण्यासाठी आत्मबलिदान करण्यास आपणास योग्य संधी प्राप्त झाली आहे अशा विचाराने त्या परोपकारी जीमूतवाहनाने योग्य असे काहीतरी निमित्त काढून मित्रावसूला घराकडे धाडून दिले. काही क्षणांनी महाकाय गरुडाच्या विशाल पंखांच्या फडफडाटाने भोवतालचे अरण्य हादरू लागले. तेव्हा गरुडाचे आगमन होत आहे असे ओळखून जीमूतवाहन शिलेवर चढून उभा राहिला. तोच आकाशातून वेगाने खाली आलेल्या गरुडाने एकदम झडप घालून त्याला आपल्या भक्कम चोचीत पकडून नेले. गरुडाच्या चोचीच्या आघाताने जीमूतवाहनच्या अंगातून रक्ताची धार वाहू लागली. तिने शिळा रक्तलांछित केली आणि गरुडाच्या मार्गाचीही ती खूण बनून राहिली. जीमूतवाहनाला पकडून नेणारा गरुड पर्वतमाथ्यावर त्याच्यासह उतरला आणि त्याने त्याचे भक्षण करण्यास आरंभ केला.

तिकडे शंखचूड शिवदर्शन घेऊन परत आला तेव्हा त्याला ती शिळा रक्तांकित दिसली. तेव्हा स्वतःला दूषणे देत तो माठ्या दुःखाने म्हणाला, 'अरेरे, त्या परोपकारी महाभागानं माझ्याकरिता आत्मबलिदान केलेलं दिसतंय. शक्य

झाल्यास त्याचा प्राण वाचवणं हे आपलं कर्तव्यच आहे!' असे म्हणून शंखचूड रक्तधारेच्या खुणेवरून गरुडाचा मार्ग काढीत धावत सुटला.

गरुड जीमूतवाहनास भक्षण करू लागला तेव्हा आकाशातून पुष्पवृष्टी होऊ लागली. तेव्हा आश्चर्यचकित होऊन गरुड जीमूतवाहनाकडे पाहू लागला तेव्हा त्याला जास्तच आश्चर्य वाटले. कारण जीमूतवाहन मोठ्या आनंदात दिसत होता. गरुडाला वाटले आपण आज नागाऐवजी दुसऱ्याच कोणाला तरी उचलून आणले. ही आपली मोठी चूक झाली असे वाटून त्याने जीमूतवाहनाला मुक्त केले. तेव्हा अनेक जखमांनी रक्तबंबाळ झालेला जीमूतवाहन शांतपणे गरुडाला म्हणाला, 'गरुडराज, अद्याप माझं बरंच शरीर शिल्लक आहे आणि तुझी भूकही शमलेली दिसत नाही. असं असताना तू मला सोडून स्वस्थ का बसला आहेस?'

असे जीमूतवाहनाचे धीर गंभीर शब्द ऐकून गरुड त्याला म्हणाला, 'हे साधुपुरुषा, तू खात्रीनं नाग नाहीस. कोण आहेस तू?' 'मी नागच आहे.' जीमूतवाहन म्हणाला, 'चल आटप. लवकर मला खाऊन टाक. धैर्यवान पुरुष आरंभिलेलं कार्य शेवटास नेल्याशिवाय कधीतरी सोडतात काय?' असे जीमूतवाहनाचे शब्द तिकडेच धावत येणाऱ्या शंखचूडाच्या कानी पडताच तो मोठ्यांदा म्हणाला, 'थांब, गरुडा, त्याला खाऊ नकोस. तो नाग नाही. तुझं भक्ष्य मी आहे. आज तुझी अशी कशी फसगत झाली?'

असे शंखचूडाचे शब्द ऐकताच गरुड फारच आश्चर्यचकित झाला तर परोपकारार्थ आपला देह खर्ची पडत नाही म्हणून जीमूतवाहनाला वाईट वाटले. नंतर जवळ आलेल्या शंखचूडाला विचारताच सर्व खरी हकीकत गरुडाला समजली. तेव्हा आपल्या हातून झालेल्या महान अपराधाबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. तो म्हणाला, 'उन्मार्गगामी लोकांच्या हातून असली भयंकर पापं होण साहजिकच आहे. दुसऱ्याकरिता प्राण वेचणारा हा थोर पुरुष अत्यंत स्तुतीस योग्य आहे. मी केलेल्या पापाच्या निरसनार्थ मला आता अग्निप्रवेशच केला पाहिजे!'

असे गरुडाचे प्रायश्चित्त घेण्याचे शब्द ऐकून जीमूतवाहन त्याला म्हणला, 'पक्षींद्रा, असा कष्टी होऊ नकोस. आजपासून तू नागांना खाण्याचं

सोडून दे. आजपर्यंत ज्यांना तू खाल्लंस त्यांच्याबद्दल तुला वाईट वाटलं तरी पुरे. हेच अगदी योग्य प्रायश्चित्त आहे. अग्निप्रवेश करणं निरर्थक आहे.' असे दयाशील व परापकारी जीमूतवाहनाचे हितकारक बोलणे गरुडाने मोठ्या संतोषाने मान्य केले. नंतर लहान मोठ्या जखमांनी भरलेले जीमूतवाहनाचे सर्वांग पूर्ववत करावे व आजपर्यंत भक्षण केलेल्या नागांना सजीव करावे म्हणून गरुड अमृत घेऊन येण्याकरिता स्वर्गाकडे गेला. तोपर्यंत मलयवतीच्या भक्तीने संतुष्ट झालेल्या गौरीमातेने स्वहस्ते अमृत शिंपून जीमूतवाहनास अक्षत व पूर्वीपेक्षाही जास्त देखणे केले. थोड्या वेळाने गरुड अमृत घेऊन आला. तेव्हा जीमूतवाहन शरीराने पूर्वीसारखाच झालेला पाहून त्याने समुद्रतीरावरील नागांच्या अस्थीवर अमृतसिंचन केले. त्याबरोबर मेलेले असंख्य नाग सजीव झाले आणि आपल्या प्राणदात्यास भेटण्यास त्यांनी गर्दी केली.

सुखरूप व कीर्तिवंत जीमूतवाहनाला पाहून त्याच्या आईवडिलांस, मलयवतीस व आप्तेष्टांना परमानंद झाला. दुःखान्त सुखान्त झाल्यावर कोण आनंदित होणार नाही? नंतर जीमूतवाहनाची स्तुती गात शंखचूड सर्व नागांसह पाताळलोकी गेला. गरुडाने वैकुंठाकडे गमन केले. जीमूतवाहनाची कीर्ती त्रैलोक्यात पसरली. तेव्हा देवकृपा असलेल्या थोर अशा जीमूतवाहनाचे राज्य हरण केल्याबद्दल त्याच्या नातलगांना लाज वाटली. त्यांनी ते मोठ्या आदराने व सन्मानाने जीमूतवाहनाच्या स्वाधीन केले. तेव्हा मलय पर्वतावरून तो पुन्हा हिमालयावरील आपल्या राज्यात गेला. आणि पुढे चक्रवर्ती बनून आपले आईवडिल व मित्रावसू यांच्यासह मोठ्या सुखाने राज्य करू लागला.

# लबाड कोल्हा

कोणा एका निबिड अरण्यात एक सिंह राहात होता. तो आपल्या पराक्रमाने त्या अरण्याचा राजाच झाला होता. त्याच्या भयंकर गर्जनेने त्या अरण्यात राहणाऱ्या केवळ प्राण्यांचाच नव्हे तर त्या अरण्याचाही थरकाप होत असे. अशा त्या सिंहाचा मंत्री एक लबाड व धूर्त कोल्हा होता. नेहमी स्वतःचे डोके थंड ठेवून तो मोठ्या चातुर्याने धन्याबरोबर आपलेही कार्य साधून घेत असे.

एके दिवशी एक राजा त्या अरण्यात शिकारीसाठी आला. त्याने तिथे पुष्कळ प्राण्यांची शिकार केली. दैववशात् त्या अरण्याचा राजा असलेला सिंहही राजाच्या नजरेस पडला. तेव्हा त्याने तत्काळ एक तीक्ष्ण बाण आपल्या धनुष्याला जोडून तो त्या सिंहावर सोडला. पण सिंहाच्या आयुष्याची दोरी बळकट असल्यामुळे तो त्या बाणाने मेला नाही. उलट मोठमोठ्यांदा गर्जना करीत आणि लांब उड्या मारीत तो गर्द झाडीत दिसेनासा झाला. एका जातिवंत सिंहाची शिकार आपल्या हातून निसटली म्हणून राजा खिन्न झाला. पण सूर्यास्ताचा समय झाल्यामुळे त्या जखमी सिंहाच्या शोधार्थ पुढे न जाता तो राजा मागे वळून आपल्या नगराकडे परत गेला.

तिकडे राजाच्या बाणाने जखमी झालेला सिंह आपल्या गुहेत जाऊन स्वस्थ पडून राहिला. काही वेळाने भुकेने तो व्याकुळ झाला. तेव्हा त्याचा मंत्री कोल्हा त्याला म्हणाला, 'महाराज, तुम्ही असं स्वस्थ पडून राहिला तर भुकेनं व्याकुळ होणारच. तेव्हा अरण्यात जेवढं दूर जाणं शक्य असेल तेवढं जाऊन एखादी शिकार का मिळवीत नाही ? तसं न केल्यानं आपली उपासमार होत आहे आणि आपले जे आम्ही सेवक त्यांनाही उपास घडत आहे.'

असे कोल्ह्याचे शब्द ऐकून सिंह त्याला म्हणाला 'कोल्होबा, काय करू रे, त्या राजाच्या धारदार बाणानं माझ्या अंगाला झालेली जखम जोपर्यंत बरी होत नाही तोपर्यंत गुहेतही चालता येणं मला शक्य होत नाही तर मग

अरण्यात जाऊन शिकार मिळविण्याची गोष्ट दूरच राहिली. मला असं वाटतं की एखाद्या गाढवाचे कान व हृदय ही दोन्ही मला खायला मिळतील तर माझी जखम लवकर बरी होईल. तेव्हा काही तरी युक्ती योजून तू एखाद्या गाढवाला त्वरेनं इथं घेऊन ये.' 'ठीक आहे. जशी आपली आज्ञा,' असे म्हणून कोल्होबा तेथून निघाला.

अरण्यात गाढवाचा शोध करीत तो इकडे तिकडे खूप भटकला पण तेथे एकही गाढव त्याच्या नजरेस पडले नाही. तेव्हा तो मनात म्हणाला, 'माणसाच्या वस्तीकडं गेल्याशिवाय गाढव काही भेटणार नाही, तेव्हा तिकडंच चक्कर मारावी हे चांगलं!' अशा विचाराने तो लोकवस्तीच्या शोधार्थ अरण्यातून बाहेर पडला. काही अंतर चालून जाताच त्याला एक मोठा तलाव दिसला आणि त्याच्या काठी चरत असलेले एक गाढवही त्याने पाहिले. तेव्हा कोल्ह्याला फार आनंद झाला.

नंतर रमत गमत तो त्या गाढवाजवळ गेला आणि त्याला म्हणाला, 'गाढवदादा, तुझ्याकडं बघितलं की तुझं बरं चाललं आहे असं मला नाही वाटत! किती अशक्त प्रकृती झाली आहे तुझी?' 'काय करायचं, बाबा,' गाढव कष्टी होऊन म्हणाले, 'मी आहे एका धोब्याचा गाढव. माझा धनी काही चांगला नाही. तो माझ्या पाठीवर भरपूर ओझं लादतो. मला खूप राबवतो. चांगलं चुंगलं तर कधीच खाऊ घालत नाही. जे काही खायला देतो ते देखील थोडंच असतं. त्यामुळं उपासमारीनं माझी प्रकृती अशी होईल नाहीतर कशी होईल?'

असे त्या साध्या भोळ्या गाढवाचे कष्टी शब्द ऐकून तो लबाड कोल्हा त्याला म्हणाला, 'अशी जर परिस्थिती आहे तर तुझ्या त्या दुष्ट धन्यापाशी त्याची ओझी वाहण्याचे कष्ट सहन करीत तू का राहिला आहेस! तुझ्या जागी दुसरा कोणी असता तर एवढा त्रास करून घेत तो इथं मुळीच राहिला नसता. समजलं!' 'मग मी काय करावं अशी तुझी इच्छा आहे?' गाढवाने विचारले. 'माझ्याबरोबर यावं', कोल्हा म्हणाला, 'मी तुला एका झकास अरण्यात घेऊन जातो. तिथं हिरवंगार गवत आहे. झऱ्याचं स्वच्छ थंडगार पाणी आहे. भरपूर खायचं, प्यायचं आणि मनसोक्त वाटेल तिथं भटकायचं एवढंच काम तू तिथं करायचं. मग काय तुझी प्रकृती एवढ्या झपाट्यानं सुधारेल की तू ओळखू

सुद्धा यायचा नाहीस!' 'अस्सं!' गाढव उद्‌गारले, 'मग छानच होईल की!' चल, आताच मी येतो तुझ्या बरोबर. त्या झकास अरण्यात केव्हा जाईन असं मला झालंय्,' असे म्हणून कोल्ह्याच्या गोड बोलण्याला भुललेलं गाढव त्याच्या बरोबर चालू लागले.

लबाड कोल्ह्याने त्या गाढवाला थेट सिंहाच्या गुहेजवळील झाडीत नेले. आणि तेथील वनशोभा तो गाढवाला दाखवू लागला. तेवढ्यात मोठ्या कष्टाने आपल्या गुहेबाहेर पडलेला सिंह धडपडत गाढवाच्या पाठीमागे गेला. त्याने आपला दुर्बल पंजा गाढवाच्या पाठीवर मारताच भ्यालेल्या गाढवाने चटकन् मागे बघितले आणि तत्क्षणी ते जीव रक्षणार्थ धूम पळत सुटले. जखमी सिंह त्याच्यामागे धावून त्याला मारण्यास असमर्थ ठरला. तो मोठा निराश होऊन पुन्हा आपल्या गुहेत जाऊन पडला.

तेव्हा कोल्हा उपहासाने त्याला म्हणाला, 'महाराज, मोठ्या युक्तीनं मी त्या मठ्ठ गाढवाला इथं घेऊन आलो, पण तुम्ही त्याला मारू शकला नाहीत तर हरिणादिक इतर प्राण्यांना मारण्याची गोष्ट दूरच राहिली. नाही का!' असे कोल्ह्याचे परखड शब्द ऐकून दुर्बल झालेला सिंह त्याच्यावर रागावला नाही. उलट जास्तच मऊ आवाजात तो म्हणाला, 'कोल्होबा, खरंच तू फार शहाणा आहेस. मला त्या गाढवाला मारणं का जमलं नाही त्याचं कारण तुला माहीत आहेच. कृपा करून पुन्हा गाढवाला इथं घेऊन येण्याचा प्रयत्न कर. या खेपेस मात्र प्रथमपासूनच चांगल्या तयारीनं राहीन. तू गाढवाला इथं आणलं की मी त्याला लगेच मारून टाकीन. जा, आता लवकर जा!'

असे सिंहाचे निश्चयी शब्द ऐकून कोल्हा त्या पळून गेलेल्या गाढवाच्या शोधार्थ निघाला. इकडे तिकडे पाहात तो जात असताना काही अंतरावर एका झाडाखाली उभे असलेले ते धोब्याचे गाढव त्याला दिसले. तेव्हा त्याच्याजवळ जाऊन कोल्ह्याने त्याला विचारले, "मित्रा, तू एकाएकी पळून का गेलास?" असा त्या कोल्ह्याचा प्रश्न ऐकून गाढव त्याला म्हणाले, "अरे, तशीच वेळ आली होती. नाहीतर मला जीव गमवावा लागला असता. माझ्या पाठीमागून आलेल्या सिंहाने माझ्या पाठीवर आपला पंजा मारला असं मला दिसलं त्यामुळे जीवाच्या भीतीने मी पळत सुटलो." असे गाढवाचे शब्द ऐकताच तो लबाड कोल्हा हसत त्याला म्हणाला, "मित्रा, खरं सांगू; तुला तसा

भास झाला. कुठला सिंह आणि कुठलं काय ? तुझ्यावर हल्ला करण्यास समर्थ असा एकही प्राणी या अरण्यात नाही. पहा मी तुझ्यापेक्षा दुर्बळ असून सुद्धा इथे सुखसमाधानाने राहिलो आहे की नाही ते ! तेव्हा पुन्हा माझ्याबरोबर त्या ठिकाणी चल, तुझ्या सुखाची गोष्ट मी तुला सांगत आहे.''

गाढव खरोखरच मठ्ठ होते म्हणून त्या लबाड आणि कपटी कोल्ह्याच्या बोलण्यावर त्याने पुन्हा विश्वास ठेवला आणि त्याच्याबरोबर ते चालू लागले. कोल्ह्याने पुन्हा त्याला पूर्वीच्याच ठिकाणी नेले. तेथे एका झाडाआड दबा धरून बसलेल्या सिंहाने मागून गुपचुपपणे येऊन गाढवावर हल्ला केला. आणि आपल्या पंजाच्या तीक्ष्ण नखांनी त्याला मारून टाकले. नंतर जवळच असलेल्या कोल्ह्याला तो सिंह म्हणाला, 'कोल्होबा, मी जवळच असलेल्या झऱ्याकडे जाऊन स्नान करून येतो. तोपर्यंत या गाढवाच्या शरीराचे काळजीपूर्वक रक्षण कर.' तेव्हा 'ठीक आहे, महाराज' असे कोल्हा म्हणताच सिंह झऱ्याच्या दिशेने निघून गेला. तो जेव्हा झाडीत दिसेनासा झाला तेव्हा लबाड कोल्ह्याने आपल्या भुकेचे निवारण करण्याकरिता त्या गाढवाचे कान व हृदय खाऊन टाकले.

नंतर काही वेळाने स्नान केलेला व भुकेलेला सिंह मोठ्या आशेने तेथ आला. त्याला आपली जखम बरी होण्यासाठी प्रथम गाढवाचे कान आणि हृदय खावयाचे होते. पण आपण मारलेल्या गाढवाला कान नाहीत आणि हृदयही नाही असे पाहून त्याला मोठे आश्चर्य वाटले. त्याने कोल्ह्याला विचारले, 'या गाढवाला कान व हृदय ही दोन्हीही नाहीत, हे कसं काय ?' तेव्हा तो धूर्त कोल्हा म्हणाला, 'महाराज, या गाढवाला पूर्वीपासूनच कान व हृदय नव्हते. ती दोन्ही जर त्याला असती तर तो मठ्ठ गाढव तुम्हाला पाहून पळून गेल्यानंतर पुन्हा परत इथे कशाला आले असते ?' असे त्या धूर्त कोल्ह्याचे बोलणे सिंहाला खरे वाटले आणि त्याने बिन कानाच्या आणि बिन हृदयाच्या गाढवाला खाऊन आपली भूक शमविली. सिंहाचे पोटभर खाणे झाल्यावर जे काही उरले सुरले त्यावर त्या लबाड काल्ह्याने ताव मारला हे सांगणे नकोच.

२९५८
BVBK-0402978